ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

मे २०११ मूल्य १० रुपये

## रवींद्रनाथ टागोर यांचे समग्र जीवनदर्शन घडवणारी मराठीतील पहिली ग्रंथ-त्रयी










## भूकंपाने जपान हादरला... जपानी नाही!

डॉ. स्वाती सोमण



## घोंगडीवाला बागुलबुवा

डॉ. उज्ज्वला दळवी

## नाशकात पोथ्यांचे इ-ग्रंथालय...

वंदना अत्रे

को.म.सा.प.चे रोहा येथील १३ वे साहित्य संमेलन





भालचंद्र मुणगेकर, मधु मंगेश कर्णिक, जलसंपदामंत्री सुनील तटकरे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, संमेलनाध्यक्ष दिनकर गांगल, अनुराधा गांगल आणि अनिल तटकरे

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001



'आठवा चिरंजीव : डॉ. शरदकुमार दीक्षित' या पुस्तकाचे अनौपचारिक प्रकाशन डॉ. संचेती यांच्या रुग्णालयात नुकतेच झाले. त्याप्रसंगी डॉ. कांतिलाल संचेती, पलंगावर डॉ. शरदकुमार दीक्षित, त्यांच्या शेजारी त्यांची बहीण प्रभा ठकार, ग्रंथालीच्या लतिका भानुशाली, डॉ. प्रतिभा मुडगेरीकर व सीमा वाकडमाने



'मी विंदा बोलत्येय!' या जयमाला देसाई यांनी लिहिलेल्या आपल्या अपंग मुलीच्या आत्मकथनपर पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच गोरेगाव येथे ज्येष्ठ नाट्यकलावंत मोहनदास सुखटणकर यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी उपस्थित कवी प्रसाद कुलकर्णी, लेखिका जयमाला देसाई आणि रमाकांत देसाई

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा संडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**मे २०११ वर्ष ३१ वे,**
**अंक पाचवा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**
**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या शतकोत्तर सुवर्णजयंतीचे हे वर्ष. त्याचे औचित्य साधून डॉ. नरेंद्र जाधव यांनी अनुवाद व संपादन केलेले 'भयशून्य चित्त जेथ...' हे पुस्तक 'ग्रंथाली'ने २० नोव्हेंबर २०१० रोजी प्रसिद्ध केले. ते करत असतानाच, डॉ. जाधव यांनी रवींद्रनाथांचे समग्र जीवनदर्शन मराठी वाचकांपुढे आणावे असा संकल्प केला होता. त्यातूनच त्यांची 'रवींद्रनाथ टागोर : युगनिर्माता विश्वमानव' आणि 'रवींद्रनाथ : समग्र साहित्यदर्शन' ही अन्य दोन पुस्तके सिद्ध झाली. त्यांचे प्रकाशन ८ मे रोजी दिल्लीत आयोजित केले आहे.

रवींद्रनाथांच्या जीवनकार्याची सर्वांगीण ओळख करून देणारी ही मराठीतील पहिलीच ग्रंथ-त्रयी आहे. बंगालीव्यतिरिक्त इंग्रजी व हिंदीमध्ये रवींद्रनाथांवर काही प्रमाणात लिखाण झाले. मराठीत, 'साधना'ने मंगेश पाडगावकरांच्या संपादनात टागोर जन्मशताब्दीनिमित्त एक विशेषांक प्रसिद्ध केला होता. त्यांच्या काही साहित्याचा अनुवाद मृणालिनी गडकरी, मामा वरेरकर, सरोजिनी कमतनूरकर आदींनी केला आहे. बोरकर, शिरवाडकर यांनी त्यांच्या काही कवितांचा अनुवाद केला. पुलंनी त्यांच्यावर लिहिले आहे. परंतु यापलीकडे या द्रष्ट्या व्यक्तिमत्त्वाबद्दल समग्र असे काही वाचण्यास उपलब्ध नसल्याची खंत डॉ. जाधव यांना होती. त्यामधून रवींद्रनाथांचे बहुपेडी व्यक्तिमत्त्व वाचकाला थक्क करून सोडणारे आहे. डॉ. नरेंद्र जाधव यांनी चिकाटीने ते या ग्रंथ-त्रयीमधून मराठी वाचकासाठी मांडले आहे. रवींद्रनाथांचे शिक्षणविषयक, इंग्रजी भाषाविषयक, खेड्यांचे प्राकृतिक स्वरूप, ग्रामविकासाचे प्रयोग, सहकारी तत्त्वावर शेतीबाबत अथवा यंत्रयुगात होणाऱ्या सांस्कृतिक ऱ्हासाबद्दलचे विचार मुळातून वाचल्यावर त्यांची दूरदृष्टी दिसते. त्यांच्या चिंतनशील मनात, राष्ट्रभावना जोपासताना वैश्विक परिमाण साधण्यासाठी जगभरातल्या संस्कृतींच्या उत्तम वाणांचा संकर होण्याची गरज प्रतिपादन करताना ते विश्वमानव होताना दिसतात. त्यांच्या सामाजिक अभ्यासाचे प्रतिबिंब त्यांच्या संवेदनशील साहित्यात उमटते. ते सौंदर्यवादी होते हे त्यांच्या जीवनशैलीतून प्रतीत होते. त्यांचा आइन्स्टाईन, एच.जी. वेल्स, गांधी, टिळक, योगी अरविंद घोष अशा विविध क्षेत्रांतल्या दिग्गजांबरोबरचा संवाद यातून वाचायला मिळतो.

या ग्रंथ-त्रयीमधून डॉ. नरेंद्र जाधव यांनी मराठी साहित्याला समृद्ध केले आहेच, शिवाय अशा प्रकारच्या ग्रंथांची अधिक निर्मिती होण्यासाठी अनेकांना प्रेरणा दिली आहे.

'ग्रंथाली'ने ही ग्रंथ-त्रयी प्रसिद्ध करावी हे तिच्या आजवरच्या कारकिर्दीला साजेसे आहे.

**– संपादक**

## डॉ. नरेंद्र जाधव लिखित, अनुवादित-संपादित रवींद्रनाथ टागोर समग्र जीवनदर्शन घडवणारी मराठीत पहिली ग्रंथ-त्रयी




### भयशून्य चित्त जेथ...

अनुवाद व संपादन **डॉ. नरेंद्र जाधव**

रवींद्रनाथांची अलौकिक काव्यप्रतिभा केवळ भक्तिरसपूर्ण 'गीतांजली'पुरती मर्यादित नव्हती. त्यांच्या काव्यप्रतिभेने स्वदेश, समाज, प्रेम, निसर्ग, भक्ती आणि मृत्यू अशा अनेक विषयांना समर्थपणे हात घातला होता. त्यांचे वेगवेगळे भावदर्शन घडवणाऱ्या निवडक १५१ कविता या संग्रहात आहेत. सोबत मूळ कविताही आहेत. स्वदेश (१० कविता), समाज (३० कविता), प्रेम (५० कविता), निसर्ग (१५ कविता), भक्ती (३६ कविता), मृत्यू (१० कविता). अशा या १५१ कवितांपैकी इंग्रजी गीतांजलीतील कविता आहेत २७. उरलेल्या १२४ कविता इंग्रजी गीतांजलीपलीकडच्या आहेत. त्यातही १५ कविता तर मराठीत प्रथमच आल्या आहेत. उदाहरणार्थ, रवींद्रनाथांची शिवाजी महाराजांवरील कविता, जी बंगालीमधून मराठीत आणण्यात आली आहे.




### रवींद्रनाथ टागोर : युगनिर्माता विश्वमानव

**डॉ. नरेंद्र जाधव**

'रवींद्रनाथ टागोर : युगनिर्माता विश्वमानव' या ग्रंथात रवींद्रनाथांचा समग्र जीवनपट, त्यांची वैचारिक जडणघडण, एकूणच जीवनदृष्टी आणि कार्यकर्तृत्वाचा विस्तृत आढावा घेण्यात आला आहे.




### रवींद्रनाथ टागोर : समग्र साहित्यदर्शन

अनुवाद व संपादन **डॉ. नरेंद्र जाधव**

रवींद्रनाथ जितके महान साहित्यिक होते तितकेच ते उत्तम समीक्षकही होते. त्यांची साहित्यातील अनुभूती जितकी प्रामाणिक होती तितकीच त्यांची साहित्याविषयीची तात्त्विक बैठक पक्की होती. ह्याची खात्री 'साहित्यचिकित्सा', 'साहित्याची सामग्री', 'साहित्याचे तात्पर्य', 'विश्वसाहित्य', 'साहित्यविचार' इत्यादी निबंधांतून पटू शकते. 'सौंदर्यबोध', 'रंगमंच', 'काव्यातील उपेक्षिता', 'मुलांसाठी गाणी' इत्यादी निबंधांतून रवींद्रनाथांची मूलगामी समीक्षा प्रकट होते.

या ग्रंथात त्यांच्या काही साहित्यकृतींचा अंशत: अनुवाद सादर करण्यात आला आहे. त्यांची एक प्रसिद्ध कथा 'काबुलीवाला', 'गोरा' ही गाजलेली कांदबरी आणि 'चिरकुमारसभा' हे प्रहसन त्यापैकी काही होत. तसे पाहता, रवींद्रनाथांच्या ह्या उत्कृष्ट साहित्यकृतींचा खरा आस्वाद त्या कलाकृती संपूर्ण वाचल्यावरच मिळू शकतो. परंतु ज्या वाचकांना त्या कलाकृती सहजासहजी उपलब्ध होणार नाहीत त्यांना रवींद्रनाथांच्या लालित्यपूर्ण साहित्याचे किमान दर्शन तरी घडावे म्हणून या कलाकृती अंशतः देण्यात आल्या आहेत.

**हार्ड बाउंड, बॉक्ससह ही ग्रंथ-त्रयी केवळ १२०० रुपयांत!**
**सोबत 'आमचा बाप आन् आम्ही' जनावृत्ती भेट.**
**टपालखर्च १०० रु. वेगळा पाठवावा.**

# घोंगडीवाला बागुलबुवा

## डॉ. उज्ज्वला दळवी

''शिरीषला पुण्याच्याच मुली सांगून येतायत. कसं जाणार बघायला?''

''खरंच आहे. तिथे स्वाइन फ्लूची साथ जोरात आहे ना! नसता धोका नको पत्करायला.''

''हो ना! सध्या तिथे म्हणे लग्नात भटजीदेखील मास्क लावूनच मंगलाष्टकं म्हणतात!''

२००९ मध्ये फ्लूच्या वराहावतारामुळे (स्वाइन फ्लू) खरोखरच भयाची अशी त्सुनामी उभ्या जगात उसळली होती.

खरं तर पुण्यामुंबईसारख्या शहरांना फ्लूची साथ चिरंतन साथ देत असते. मग ही घबराट कशापायी? साधा फ्लू आणि बर्ड फ्लू किंवा स्वाइन फ्लू यांमध्ये काय फरक?


कुठलाही फ्लू होतो तो विषाणूं (व्हायरस)मुळे.

विषाणू हा सजीव आणि निर्जीव यांच्या सीमारेषेवरचा निसर्गाचा चमत्कार आहे. या विषाणूंना पेशी नसतात पण त्यांना स्वतःची जनुकं(जीन्स) असतात. ही जनुकं डीएनएची किंवा आरएनएची असतात. जोवर हे विषाणू मोकळे भटकत असतात तोवर त्यांच्या जनुकांभोवती प्रथिनांची बनलेली एक घोंगडी लपेटलेली असते. त्याखेरीज त्यांच्याजवळ दुसरं काहीही नसतं.

प्राणी-वनस्पती-जंतू या साऱ्या सजीवांपाशी स्वतःचे असे पेशींचे कारखाने असतात. जीवन चालू रहावं म्हणून राबणारी यंत्रं म्हणजे प्रथिनं (प्रोटिन्स). ती या पेशींच्या कारखान्यातच तयार होतात. विषाणूंपाशी असा कारखाना नसतो. पण कारखान्याचं व्यवस्थापन-संचालन करू शकणारी जनुकं मात्र असतात. तेवढीच सोबत घेऊन ते 'फ्री लान्स मॅनेजर' मुक्त संचार करतात.


असे हे स्वच्छंदी विषाणू हवेतून, अन्नातून, इंजेक्शनच्या सुईतून सजीवांच्या पेशींशी लगट करतात आणि त्या पेशींत घुसतात. पेशींमध्ये, आरएनएच्या मदतीनं, प्रथिनं तयार करणारा कारखाना चालूच असतो. त्यावर केंद्रीय डीएनएच्या व्यवस्थापक मंडळाची देखरेख असते. त्या कारखान्याच्या केंद्रीय व्यवस्थापक मंडळात ह्या आयत्या बिळातल्या नागोबांची म्हणजेच विषाणूंची जनुकं शिरकाव करून घेतात. मग ती विषाणूंची व्यवस्थापक जनुकं आकृतीत(आ.२) दाखवल्याप्रमाणे त्या पेशींच्या कारखान्याकडून स्वतःची कामं करवून घेतात. तिथल्या आरएनएकडून आपल्याच जनुकांच्या प्रती करवून घेणं, त्यांच्यावर पांघरायला प्रथिनांच्या घोंगड्या बनवून घेणं यासारख्या कामांसाठी त्या परक्या पेशीला राबवलं जातं. भरपूर रसद जमली की विषाणूंचा ताफा पुढल्या मोहिमेवर निघतो. फ्लू आणि एड्सचे असे नव्यानं तयार झालेले विषाणू निघताना त्या पेशीच्या किंवा पेशीकेंद्राच्या आवरणाचे तुकडेही आपल्या घोंगडीवरून पांघरून घेतात. त्या ओळखीच्या पांघरुणांमुळे तर आजूबाजूच्या पेशींना ते आपलेसेच वाटतात.

या रगाड्यात त्या पेशीला तिच्या स्वतःच्या जगण्यासाठीची कर्तव्यं जमली नाहीत तर बापडी मरून जाते. पण तोवर मूळच्या एका विषाणूची विषाणू-सेना तयार झालेली असते आणि ती ताज्या दमानं नव्या पेशी शोधत जाते.



**साधा फ्लू ते स्वाइन फ्लू असे वेगवेगळे फ्लूअवतार ज्या विषाणूंमुळे होतात ते स्वच्छंदी, भटके विषाणू कॅन्सर, एड्सपर्यंत कोणकोणते प्रताप करतात हे शोधताना शास्त्रज्ञांना त्यांच्या उरफाट्या काळजाचा ठाव लागला. त्याच भाषेत त्यांना उत्तरं शोधली. या विषाणूंना ज्ञानसागराच्या सफरीचे सुकाणू केले...**

हिवाळ्या-पावसाळ्यात दरवर्षी, 'नेमेचि येतो जो इन्फ्लुएन्झा' तो साधा फ्लू. त्याची प्रथिन-घोंगडी, त्याच्या जनुकांचा तोंडावळा सगळं आपल्या शरीरातल्या संरक्षकदलाला माहीत झालेलं आहे. तरी तो त्या दलाला चकवायला दर वर्षी जनुकांच्या रचनेत थोडा थोडा बदल करतो. नवनवे मुखवटे चढवतो. पण तरीही हा जुना शत्रू आपल्या पांढऱ्या रक्तपेशींना ओळखता येतो. त्यामुळे तो लवकरच आटोक्यात येतो. शिवाय, शास्त्रज्ञ त्याच्या मुखवट्याची कुंडली मांडून यंदा फ्लू या रूपात येणार आहे, असं भविष्य वर्तवतात.



आ. १ डीएनए किंवा आरएनए प्रथिनयुक्त घोंगडी
विषाणूची रचना

त्याप्रमाणे त्या वर्षीची लस तयार केली जाते. म्हातारी माणसं, आजारी माणसं यांना त्या लशीचा फायदा होतो.

पण फ्लूच्या विषाणूंच्या बऱ्याच पोटजाती आहेत. चोरांची जशी नीती असते तसे या विषाणूंचेही काही अलिखित नियम आहेत. साधारणपणे डुकरांचा फ्लू फक्त डुकरांनाच त्रास देतो. तो पक्ष्यांच्या वाटेला जात नाही. पक्ष्यांचा फ्लू माणसाकडे ढुंकूनही बघत नाही. घोड्यांना आणि कुत्र्यांनाही त्यांचे हक्काचे वेगवेगळे फ्लू असतात. हे सारे ‘अमानुष’ आजार कटाक्षानं जातिभेद पाळतात.


मात्र ही मर्यादा उल्लंघून, २००७ साली, पक्ष्यांचा फ्लू माणसांमध्ये पसरू बघत होता. २००९ मध्ये तर डुकरांच्या फ्लूनं नवंच रूप धारण केलं. त्यानं काही जनुकं पक्ष्यांच्या फ्लूची तर काही माणसांच्या फ्लूची उचलली. माणसांच्या फ्लूकडून उसन्या घेतलेल्या हिकमती वापरून तो माणसांच्या पेशींपर्यंत पोचला. तिथे डुकरांच्या आणि पक्ष्यांच्या जनुकांमुळे बदललेलं त्याचं ते वेगळं रूप संरक्षक पेशींच्या हेरांना ओळखता आलं नाही. फ्लूला पेशींमध्ये शिरकाव मिळाला. साथीची लागण झाली. फ्लूच्या त्या नव्या रूपाला पेशींकडून पुरेसा प्रतिकार होईना. माणसं मृत्युमुखी पडली. साथ फैलावली.

मग हा आजार माणसांकडून पुन्हा डुकरांकडे गेला, एका टर्की पक्ष्यालाही लागला. जातींच्या मर्यादा अशा ओलांडत राहिल्यामुळे त्याचं रूप फिरून बदलण्याची शक्यता वाढत गेली. सूक्ष्मजीवशास्त्राच्या नव्या तंत्रांमुळे त्याची ही लबाडी शास्त्रज्ञांना समजली. ते त्याच्या मागावर राहिले. जगभर दवंडी पिटली गेली. सगळे देश सावध झाले.

अशा बहुरूपी विषाणूला बहुधा हुरूप तसा कमीच असतो, तो थोडा अशक्तच असतो. पण कधीकधी असा अनोळखी चोर अतिदांडगा निघतो आणि संरक्षक पेशींच्या गोंधळाचा फायदा घेऊन यजमानाच्या जिवावर उठतो. १९१८-१९ सालच्या, जगाचं धाबं दणाणून सोडणाऱ्या फ्लूचा विषाणूही असाच बहुरूपी होता असा शास्त्रज्ञांचा कयास आहे. त्यामुळे पुन्हा तशीच जीवघेणी साथ येईल, ती औषधांना जुमानणार नाही, या शंकेनं शास्त्रज्ञ घाबरले. पण जनुकशास्त्राच्याच शोधांमुळे उतारा सापडला. रुग्णांमध्ये सापडलेल्या विषाणूंच्या जनुकातल्या आरएनएच्या अनेक प्रती काढून (PCR) त्याचं चटकन, बिनचूक निदान करता आलं.

मग शास्त्रज्ञांनी या नव्या विषाणूचाच एक असा तुकडा काढला की ज्यानं रोग झाला नसता. त्या तुकड्याचं जंतूंच्या जनुकात कलम केलं. जंतूंच्या पेशीत कारखाना चालू असतोच. त्यात या तुकड्याच्या अनेक प्रती करून घेतल्या गेल्या. त्यांची लस केली. ही लस वापरून माणसांच्या पांढऱ्या पेशींना या नव्या जंतूची तोंडओळख करून देता आली. या लशीमुळे विषाणूच्या ओळखपत्राच्या प्रती, 'WANTED' म्हणून पेशीपेशीत पोचल्या. प्रतिकारशक्ती सज्ज झाली. साथ आटोक्यात आणायला तिची मदत झाली.

त्याचबरोबर टॅमिफ्लू हे विषाणूंना पेशींमध्ये कैद करणारं औषध वेळेवर तयार झालं. त्याचीही मदत झाली. विषाणूंना काबूत आणायला औषधंही वेगळ्या प्रकारची लागतात. टायफॉईड, न्यूमोनिया यांसारख्या आजारांची गोष्ट वेगळी असते. ते आजार जंतूंची (बॅक्टेरिया) लागण झाल्यामुळे होतात. त्या जंतूंना स्वतःच्या पेशी असतात. त्यांच्याकडे जगण्याच्या कारभाराचा कारखाना असतो. कारखाना म्हटला की तटबंदी, यंत्रं, कामगार, उत्पादन, पॅकिंग सगळं आलंच. ॲन्टिबायॉटिक्स यांच्यातल्या एखाद्या विभागावर हल्ला करतात. उदाहरण द्यायचं तर पेनिसिलिन कारखान्याची तटबंदी (सेल वॉल) फोडतं. स्ट्रेप्टोमायसिन तिथल्या यंत्रांमध्ये (रायबोसोम) अडकून काम बंद पाडतं.




**आ.२ पेशीच्या कारखान्यात एड्सच्या विषाणूची वाढ**

कारखान्याचं काम थांबतं. जंतू मरतात.

विषाणूंच्यापाशी कारखानाच नाही. म्हणून त्यांच्यावर ॲन्टिबायॉटिक्सचा इलाज चालत नाही. त्यांच्याशी लढायचं तर त्यांचीच तंत्रं वापरावी लागतात. कुठल्याही पेशीत शिरल्यावर तिथे हुकूमत गाजवायला विषाणू काही कार्यकारी प्रथिनांचा वापर करतो. एसायक्लोव्हिरसारखी औषधं असल्या कार्यकारी प्रथिनाला चकवून (व्हायरल पॉलिमरेज) विषाणूच्या जनुकांच्या बांधणीतच ओवली जातात. त्यामुळे ती जनुकं अपुरीच राहतात. विषाणूचा हल्ला निष्फळ होतो. टॅमिफ्लू विषाणूची पेशीतून बाहेर पडायची वाट रोधून धरतं. तो कैद होऊन पडतो.

गेली तीन-चार दशकं जगभर पसरत जुनीपुराणी झालेली साथ म्हणजे एड्सची. हा हवेतून, खाण्यापाण्यातून पसरत नाही. तो रक्तातून, स्रावांतून, इंजेक्शनच्या सुईतून, मादक पदार्थ टोचण्याच्या सुईतून फैलावतो. एड्सचा विषाणू चोरासारखा माणसाच्या शरीरात घुसतो आणि सरळ आघाडीच्या पोलिसांच्या फळीशी संगनमत करतो. तो पांढऱ्या रक्तपेशीं (CD4)वरच्या एका टेहळ्याशीच हातमिळवणी (GP120) करतो.

या विषाणूच्या जनुकांत डीएनए नसतं. त्याचाच भाऊबंद असलेलं आरएनए असतं. एरवी पेशींमध्ये डीएनएतल्या आदेशावरून आरएनए तयार होतं. या चोराची सारी तऱ्हाच उरफाटी. त्याचं कार्यकारी प्रथिन (रिव्हर्स ट्रान्सक्रिप्टेज) आरएनएपासून उलट डीएनए तयार करतं. म्हणून तर त्याला रेट्रोव्हायरस किंवा उलट्या चालीचा विषाणू म्हणतात. हा उरफाटा डीएनए पांढऱ्या पेशीच्या केंद्रात घुसतो. तिथे त्या पेशीच्या जनुकांमध्ये जाऊन घरजावई होतो. पांढऱ्या पेशीच्या कारखान्यात एड्सचा आरएनए तयार व्हायला लागतो. ती पेशी जिथे जाईल तिथे तिथे या विषाणूला पोटात घेऊनच जाते; त्याचा प्रसार करत जाते. शेवटी थकून मरून जाते.

हळूहळू आघाडीची फळी अशी निकामी होत जाते. ती एड्सशीच काय बाकीच्या साध्यासुध्या आजारांशी झगडायलाही असमर्थ ठरते. साध्या सर्दीपडशाचं स्वरूप उग्र होतं. टीबीसारखे आजार बेगुमान होतात. पांढऱ्या रक्तपेशी कर्करोगाशीही झुंज देतात. त्यामुळे एरवी बऱ्याच प्रकारच्या कॅन्सरच्या पेशी मुळातच निपटून टाकल्या जात असतात. एड्स झाला की या पेशींशी लढायलाही संरक्षक फौज कमी पडते. कर्करोग फोफावतो.

एड्सवरची काही औषधं (झिडोव्ह्युडिन, सॅक्विनाव्हिर) त्याच्या कार्यकारी प्रथिनांचं काम थांबवतात. काही(CCR5 ॲन्टागॉनिस्ट्स्) त्याच्या ओळखीच्या रखवालदारालाच(GP120 रिसेप्टर) बेड्या घालतात आणि काही औषधं (रिव्हर्स ट्रान्सक्रिप्टेज इनहिबिटर्स) त्याची आरएनए ते डीएनए ही उलटी वाट बंद करतात. दुसरी काही (प्रोटीएजेस) पेशींतून बाहेर पडणं अशक्य करून त्याला कैदेतच टाकतात.

एड्स पूर्ण बरा होत नाही. पण या औषधांमुळे आयुष्याची दोरी अधिक तग धरते. कमजोर शरीरात धुमाकूळ घालणाऱ्या बाकीच्या रोगांनाही थोडा आळा बसून रोग्याचं जिणं सुसह्य होतं.

हेपॅटायटिस B आणि C हे काविळीच्या प्रकारांचे संपर्कजन्य विषाणू. ते नेहमीच्या काविळीसारखे हवेतून, खाण्यापाण्यातून पसरत नाहीत. एड्ससारखे तेही रक्तातून, स्रावांतून, सुयांतून फैलावतात. या विषाणूंमुळे यकृताचा कॅन्सर होण्याची शक्यता वाढते.

हेपॅटायटिस Bच्या विषाणूचं एक जनुक जरा रूप पालटून यकृतपेशींच्या केंद्रात वेटोळं घालून बसतं. बाकी कावीळ पूर्ण हटली तरी हे जनुक केंद्रातून ठाण हलवत नाही. ते तिथल्या, एरवी झोपलेल्या, दुष्ट जनुकांना डिवचत रहातं. ती जागी होऊन कॅन्सरचे जनक बनतात.

हेपॅटायटिस C हा त्याचा चुलतभाऊ. टोप्या बदलण्यात राजकारण्यांपेक्षाही पटाईत. तो यकृत-पेशींच्या केंद्रात शिरला की त्याच्या जनुकांच्या प्रती फार झपाट्यानं निघतात. त्या प्रतींमध्ये जी व्यवस्थापकीय नोंद असते तिच्यात त्या घाईगर्दीत दर वेळी सतराशे साठ नव्या चुका होतात. या उपसंपादकांच्या डुलक्या नसून जाणून-बुजून केलेले 'ध चा मा' असतात. त्या चुकांमुळे या विषाणूचा तोंडवळा सतत बदलता राहतो, यजमानाच्या(होस्ट) संरक्षक पेशींना चकवत राहतो. त्यामुळेच त्याचं ओळखपत्र म्हणजेच

त्याच्याविरुध्दची लस तयार करणं फार कठीण झालेलं आहे.

मानवी शरीरात अधूनमधून कर्करोगाचा उद्भव होत असतो. पण पेशींमधली काही रक्षक जनुकं त्यासाठी कानोसा घेत असतात. कर्करोगाची जरा चाहूल लागताच ही जनुकं त्याच्यावर इलाज करतात, पुष्कळदा त्याचा नायनाट करतात. हेपॅटायटिस C चा विषाणू यकृतात शिरला की तिथल्या पेशींतून अशा प्रकारच्या एका दक्ष जनुकालाच डच्चू देतो. आसमंतातली विषारी रसायनं, घातक किरण वगैरेंच्या आघातांमुळे एरवीही अशी रक्षक जनुकं निकामी होत असतात. असं हेपॅटायटिस C च्या रुग्णातही होऊ शकतं. परिणामी, असे दोन-दोन रक्षणकर्ते एका दमात गारद होतात. त्यामुळे कर्करोगाला प्रतिकार कमी होतो. त्यामुळे तो फोफावतो. सर्वेक्षणांनुसार असं दिसून आलं आहे, की ज्यांना यकृताचा कर्करोग होतो अशांपैकी सुमारे ८०% रोग्यांना असली कावीळ झालेली असतो.

सर्वसाधारणपणे होणारी साथीची कावीळ हेपॅटायटिस A मुळे होते. त्यामुळे कर्करोग होत नाही.

काही विषाणू पेशींच्या जनुक-संचयाशी असे एकरूप होतात की ती विषाणू-जनुकं त्यानंतरच्या पिढ्यान् पिढ्यांच्या पेशींत परंपरेनं चालत राहतात. यांतले काही बाकी जगातून नामशेष झाले तरी त्यांची अशा पेशींमधली जनुक-स्मारकं चिरंतन राहतात. जनुकसंचयात(जीनोम) अशा विषाणूंच्या जनुकांची अडगळ किंवा कचरा गोळा झालेला असतो. जितकी उत्क्रांती अधिक तितका अधिक कचरा पेशींमध्ये जमलेला असतो. कधीकधी त्या अडगळीची इतकी सवय होते की तिच्यावाचून अडायला लागतं. टेक्सास-मधल्या एका विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी मेंढ्यांमधलं असं एक अडगळ-जनुक निकामी केलं. त्यानंतर त्या मेंढ्यांमध्ये निकोप गर्भधारणा होईना! मानवी जनुकांना असल्या अडगळीनं जी वेसण घातली आहे तिचाही आता एपिजेनेटिक्समध्ये जोरात अभ्यास सुरू आहे.

शास्त्रज्ञ कशातूनही मानवजातीच्या, जगाच्या भल्याचा शोध घेत असतात. त्यांनी विषाणूंचाही वापर करायला सुरुवात केली आहे. एड्ससारख्या दुर्धर रोगाचा अभ्यास करतानाही शास्त्रज्ञांचा दृष्टिकोन सकारात्मकच होता. त्यांनी विषाणूंच्या उरफाट्या चालीचा फायदा घ्यायचं ठरवलं. एड्सचा विषाणू जसा उलटा, आरएनए ते डीएनए वाटचाल करतो तसेच इतरही काही विषाणू उलटे चालतात. विशेष म्हणजे, त्यांनी सर्वसाधारणपणे माणसांमध्ये कुठला आजार होत नाही. अशा विषाणूंचा शास्त्रज्ञांनी एक अभिनव वापर करून पाहिला.

> या लेखात पेशींच्या कारखान्यांचा उल्लेख आला. पुढल्या अंकात या कारखान्याला भेट देऊन आपण तिथलं इन्स्ट्रक्शन मॅन्युअल आणि एकंदर व्यवस्थापन समजून घेणार आहोत.

SCID हा एक जन्मजात आजार आहे. तो ज्यांना होतो त्या मुलांमध्ये एका जनुकात थोडी उणीव राहिलेली असते. त्यामुळे त्यांची रोगप्रतिकारशक्ती अत्यंत क्षीण असते. वेळीच उपाय केले नाहीत तर अशी मुलं जेमतेम एखादं वर्ष जगू शकतात. शास्त्रज्ञांनी अशा मुलांच्या जनुकांतली कमतरता नेमकी ठरवली. जो भाग कमी पडत होता तेवढाच प्रयोगशाळेत बेतला. त्याचं एका उलट्या चालीच्या (रेट्रोव्हायरस) निरुपद्रवी विषाणूच्या जनुकाला ठिगळ लावलं. एका आजारी मुलीच्या पांढऱ्या रक्तपेशी काढून त्यांच्यात तो विषाणू शिरू दिला. मग त्या पेशी पुन्हा इंजेक्शननं तिच्या नीलेत सोडल्या.

उलटच्या चालीच्या विषाणूनं ते जनुक-ठिगळ तिच्या पेशींच्या केंद्रात पोचवलं. तिथे बसून त्या जनुकानं तिच्या रक्तात कमी पडणारी नेमकी प्रथिनं बनवायचे आदेश दिले. पेशीच्या कारखान्यात ती प्रथिनं बनली. मुलीच्या रक्तातल्या उणिवा भरून काढायचं काम झालं. त्या विषाणूवरच्या उपकारक ठिगळामुळे तिच्या जनुकांमधल्या दोषावर पांघरूण घातलं गेलं. त्या मुलीची रोगप्रतिकारशक्ती वाढली.

तेव्हापासून आतापर्यंत सतरा मुलांवर असे उपचार केले गेले. त्यांना बरंही वाटलं. पण त्यांच्यातल्या काही जणांमध्ये हे उपचारार्थ धाडलेलं किंवा 'औपचारिक' जनुक कॅन्सरशी निगडित असलेल्या एका दुष्ट जनुकाशेजारी पोचलं. ते दुष्ट जनुक (ऑंकोजीन) त्यामुळे चाळवलं गेलं. परिणामी, त्या मुलांना नंतर ल्युकेमिया झाला. आता शास्त्रज्ञ अशी वाईट जनुक-संगत टाळण्याचे प्रयत्न करताहेत.

विषाणूंच्या जनुककोशात मानवी जनुकं ओवून ती माणसांच्या शरीरात पाठवणं जमलंच आहे. याच पद्धतीने गिनी पिग्जमधला बहिरेपणा दूर करणं, उंदरांच्या रक्तातले दोष नाहीसे करणं हेही साधतं आहे. तेच उपाय नंतर माणसांतही योजता येतील. रोगांशी टक्कर देणारी अधिक सशक्त पिकं निपजली आहेत.

२००२ साली विषाणूंची कृत्रिम जनुकं प्रयोगशाळेत तयार करता आली. तेव्हापासून विशेषतः लशींच्या संशोधनाला एक नवी दिशा लाभली आहे.

आता पुरातत्त्व संशोधकांनीही विषाणूंना हाताशी धरलं आहे. विषाणूंना आपल्या जनुकांतला मजकूर वारंवार बदलायची खोड असते. असे बदलते विषाणू जगभर पसरणाऱ्या मनुष्यजातीबरोबर कित्येक हजार वर्षांपासून स्थलांतर करत आले आहेत. सध्या अशा ठिकठिकाणी पसरलेल्या या विषाणूंच्या जनुकांचा अभ्यास करून त्यांनी इतिहासाच्या टप्प्याटप्प्यांवर कसा प्रवास केला असावा याचे आराखडे मांडले जात आहेत. त्याचा उपयोग करून पुरातन काळात मानवजातीनं कसा प्रवास केला असेल त्यासंबंधी आडाखे बांधले जातील.

आता विषाणू नुसते विषाणू राहिले नाहीत. ज्ञानसागरातल्या मानवी सफरीचे हे विषाणू आता सुकाणू झाले आहेत.

**डॉ. उज्ज्वला दळवी**
ujjwalahd9@gmail.com

# भूकंपाने जपान हादरला... जपानी नाही!

## डॉ. स्वाती सोमण

११ मार्च २०११ सेंडाई, जपान.

शुक्रवार दुपार. कामाची वेळ व दिवस असल्यानं मी नेहमीप्रमाणे माझ्या लॅबमध्ये होते. साधारणत: दुपारी दोन वाजून पस्तीस मिनिटांनी भूकंपाचा पहिला धक्का जाणवला. भूकंप ही जपानला नित्य परिचयाची गोष्ट आहे. त्यामुळे घाबरून जायचं कारण नव्हतं. पण आजचे धक्के 'वेगळे' आहेत हे थोड्याच वेळात लक्षात आलं. एकामागून एक धक्के बसायला लागले आणि हळूहळू त्यांची तीव्रता वाढू लागली. सर्वात तीव्र धक्का तर तब्बल पाच मिनिटं टिकला. काही सेकंदांच्या बारक्याशा भूकंपानंही इमारतींचा थरकाप होतो. इथे तर जवळपास वीस मिनिटं अधूनमधून काही क्षणांच्या विश्रांतीनं अख्खा प्रदेश गदागदा हलत होता.

आम्ही आमच्या पाच मजली इमारतीचे जिने उतरून बाहेर पडलो. जवळच दिसणारा पस्तीस मजली इमारतीचा टॉवर माडाच्या झाडासारखा मंद झुलताना पाहिला. कॅम्पसमधील सगळे लोक इमारतींमधून बाहेर पडले आणि मधल्या उघड्या मैदानात एकत्र जमले. आजुबाजूच्या झुलणाऱ्या इमारतींकडे पाहून एकमेकांत भूकंपाच्या तीव्रतेबद्दल कुजबुजू लागले. अर्ध्या तासातच आमचे डायरेक्टर व इतर ज्येष्ठ प्रोफेसर कर्ण्यावरून आम्हाला वेगवेगळ्या सूचना करू लागले. आम्हा सर्वांना पांढऱ्या रंगाची हेल्मेट वाटण्यात आली. आम्ही सगळे आपापल्या लॅबच्या गटानुसार उभे राहिलो. त्यानंतर तिथे जमलेल्या सगळ्यांच्या नावांची यादी करून मोजण्यात आली.

कुणाला कसली इजा वगैरे झाली का याची चौकशी व नोंद करण्यात आली. तिथे जमलेले सगळे 'आलबेल' आहेत याची खात्री झाल्यावर, बॅटरीवर चालणारा रेडिओ लावण्यात आला. सगळ्यांनी जपानी बातम्या शांतपणे ऐकल्या.

बुधवारी, ९ एप्रिलला दुपारी पावणेबाराच्या सुमारास झालेला ७.२ रिश्टर तीव्रतेचा भूकंप व त्यापाठोपाठ बुधवारी रात्री उशिरा जाणवलेले ६ ते ७ रिश्टर दरम्यानचे ३ तीव्र धक्के ही या शृंखलेची सुरुवात होती तर!

भौतिकशास्त्रमध्ये पीएच.डी. केल्यानंतर वेगवेगळ्या प्रोजेक्टच्या निमित्तानं काही देशांमध्ये काही काळ राहण्याची संधी मला मिळाली. प्रत्येक ठिकाणची भाषा, संस्कृती निराळी, चालीरीती निराळ्या. तशी सध्या जगभरच्याच नव्या पिढीवर अमेरिकन स्वच्छंद जीवनशैलीची छाप पडतेय, त्याला जपानही अपवाद नाही. पण तरीही इथल्या संस्कृतीत आधुनिक प्रगती (कदाचित पाश्चात्त्यांपेक्षा थोडी जास्तच) आणि पौर्वात्य विचारांचा संगम झालेला दिसतो. प्रसंगी प्रतिक्रिया व्यक्त करण्याची त्या त्या समाजाची एक पद्धत असते. जपानी लोकांवर 'बुशिदो सामुराई' तत्त्वज्ञानाचा पगडा आजही आहे. त्यानुसार शिस्त आणि संयम साऱ्या जपान्यांनी अंगी बाणवलेला दिसतो.

भात आणि समस्त सागरी अन्नावर ताव मारणारे जपानी कामाच्या बाबतीत एकदम काटेकोर-वक्तशीर आणि शिस्तबद्ध. भूकंप आपल्या पाचवीलाच पुजलेला आहे याची कल्पना जपान्यांना बालपणापासूनच असते. भूकंप झाल्यास कसं वागायचं यांचं प्रशिक्षण इथे शाळेपासूनच सर्वांना देण्यात येतं.

एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक वास्तव्यास येणाऱ्या परदेशी लोकांनाही हे प्रशिक्षण देण्यात येतं. त्यामुळे वारंवार भूकंप झाले आणि भूमी हादरली तरी माणसं घाबरून जात नाहीत. मी तीनच महिन्यांच्या मुक्कामासाठी सेंडाईत होते. त्यामुळे मला हे प्रशिक्षण मिळालेलं नव्हतं, पण माझ्या सहकाऱ्यांकडून त्याबद्दलच्या टिप्स मिळाल्या होत्या.

सेंडाई हे जपानच्या उत्तर-पूर्व टोहोकू भागातलं सर्वात मोठे शहर. जपानमधील तिसरं अग्रगण्य 'टोहोकू विश्वविद्यालय' सेंडाई शहरात सहा वेगवेगळ्या कॅम्पसमध्ये विखुरलेलं आहे. 'जीवनपयोगी विज्ञान' निर्माण करण्याच्या उद्देशानं सुरू करण्यात आलेल्या या विश्वविद्यालयात जगभरातून अनेक शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ कामाच्या निमित्तानं भेटीसाठी येतात. त्यामुळे सेंडाई शहर हे ॲकॅडमिक शहर म्हणून ओळखलं जातं. (पूर्वी जसं पुण्याला 'विद्येचं माहेरघर' संबोधलं जात असे तसं)

पहिल्यांदा जपानला गेले तेव्हाचा भूकंपानुभव मला घाबरवणारा होता. पहाटेचे चार-सव्वाचार वाजले असतील. कसल्याशा

हादऱ्यानं मी जागी झाले. आधी वाटलं स्वप्नात भास होतोय, मग पलंगावरून उठून उभी राहिले तर मलाच चक्कर येतेय की काय असं वाटलं. पण हादरे सुरूच. खोलीतल्या इतर वस्तू हलताना पाहिल्या, त्यांचा थरथरणारा आवाज ऐकला आणि खात्री पटली, ''बाप रे! भूकंप!''

मी पटकन दार उघडून बाहेर व्हेरांड्यात आले. सगळेच आपापल्या खोल्यांमधून बाहेर आले असतील असं वाटलं होतं. तर बाहेर सगळी सामसूम! कुणीतरी उठेल व बाहेर येईल या अपेक्षेनं मी एकटीच थोडावेळ बावळटासारखी व्हरांड्यामध्ये उभी. पण भूकंपाची सवय असलेली सगळी आजुबाजूची माणसं त्या जपानी 'पाळण्यात' निश्चिंत झोपलेली होती. मग मीही जाऊन झोपले.

दुसऱ्या दिवशी सहकाऱ्यांना याबद्दल विचारलं तर त्यांना हसू आलं, ''अगं, असे धक्के इथे वारंवारच बसतात. त्यात काय घाबरायचं?''

आयुष्यात यापूर्वी कधीही भूकंपाचा अनुभव न घेतलेल्या माणसाची अशा वेळी काय अवस्था होते, ते त्यांना काय सांगणार? गप्प बसले. मग हळुहळू त्यांच्याकडूनच सगळी माहिती मिळत गेली.

साधारण ७ रिश्टर तीव्रतेचा भूकंप होईपर्यंत जपानी माणसाच्या पोटातलं पाणी हलत नाही. भूकंपाची तीव्रता ओळखण्याची जपान्यांची सोपी पद्धत आहे. टेबलावर, फडताळात ठेवलेल्या उभ्या गोष्टी (बाटल्या, फुलदाण्या, ग्लासेस, पुस्तके इत्यादी) जर हादऱ्यानं आडव्या झाल्या किंवा खाली पडल्या तर भूकंप ७ रिश्टर किंवा त्यापेक्षा जास्त तीव्रतेचा आहे असं समजावं. अशा वेळी घरात किंवा ऑफिसात असाल तर टेबलाखाली जाऊन बसायचं किंवा चक्क बाथरूममध्ये जायचं. म्हणजे तिथे डोक्यात काही पडण्याची भीती नसते. पण जर हादऱ्यांमुळे टेबलावरचे कॉम्प्युटर, भिंतीवर फिक्स न केलेली फडताळे, फ्रीज वगैरे गदगदा हलू लागले तर मात्र तो भूकंप ८ रिश्टर किंवा त्यापेक्षा जास्त तीव्रतेचा आहे असं समजावं. अशा वेळी इमारतीच्या जिन्यानं खाली उतरून मोकळ्या जागी जायचं.

जपानमध्ये एक बरं आहे. भूकंपाच्या धक्क्याने पडतात त्या फक्त घरात, ऑफिसात ठेवलेल्या गोष्टी. घरे, इमारती, पूल, रस्ते वगैरे पडत नाहीत. मागील महिन्यात झालेल्या ९ रिश्टर तीव्रतेच्या भूकंपातसुद्धा एकही घर कोसळलं नाही, हे विशेष. जी काही जीवित व वित्तहानी झाली ती भूकंपानंतर आलेल्या त्सुनामीमुळे.

जपानमधील सगळं बांधकाम एका विशिष्ट पद्धतीनं करण्यात येतं. १९९५ साली कोबे इथं झालेल्या भूकंपात घरं व इमारती कोसळून त्याखाली सहा हजारांहून जास्त माणसं गाडली गेली. त्यानंतर वर्षभरात कायदा करण्यात आला. तेव्हापासून नंतर सगळं बांधकाम हे दहा रिश्टर तीव्रतेपर्यंतच्या धक्क्यात टिकून राहू शकेल अशाच पद्धतीनं बांधण्यात येतं. त्यामुळे भूकंपानं आपलं घर, इमारत पडेल याची फारशी भीती आता जपान्यांना वाटत नाही. म्हणूनच 'भूकंप झाला' म्हणून कुठेही पळापळ, आरडाओरड असं काहीही होत नाही.

'जपानमध्ये पुठ्ठ्याची घरं असतात' असं आपल्याकडे पूर्वी म्हटलं जायचं. आधुनिक जपानमधली घरं भक्कम असतात. शहरांमध्ये अनेक उंचच उंच बहुमजली इमारतीही उभ्या असतात. (सेंडाई त्यामानानं छोटं शहर असल्यानं तिथली सर्वात उंच इमारत ३५ मजली, तर टोकियोसारख्या महानगरीमध्ये ७२ मजल्यापर्यंतच्या इमारती आढळतात.) मोठे मोठे पूल, रेल्वेलाईन, दळणवळणाचे मोठे रस्ते (हायवे आणि एक्स्प्रेस वे) सर्व काही बांधताना प्रामुख्यानं भूकंपाचा विचार केला जातो.

आखाती देशातला एक स्ट्रक्चरल इंजिनियर जपानमध्ये ओळखीचा झाला होता. तो सांगत होता, की जपानमधील इमारती सिमेंट-काँक्रिटच्या नसतात. त्यांचा पाया पोलादी, रबरी स्प्रिंग व रोलरवर आधारित असतो. पायाकडील जोत्याच्या भागात रेती, सिमेंट, विटा, दगड इत्यादींचा वापर होतो पण वरची इमारत मुख्यत: प्रक्रिया केलेलं लाकूड, विशिष्ट प्रकारचं प्लॅस्टिक (पॉलिमर); विशिष्ट प्रकारच्या काचा इत्यादींचा वापर करून बांधतात. इमारतींच्या कॉलममध्ये मुख्यत: पोलादी केबल्स वापरतात. आपल्या इमारतींपेक्षा वजनानं हलक्या असलेल्या या इमारती जास्त इलॅस्टिक असतात. त्या भूकंपाच्या धक्क्यानं खूप हलतात आणि खूप हलतात म्हणूनच त्या कोसळत नाहीत.

मागील महिन्यातल्या तीव्र भूकंपानं कुठे कुठे या इमारतींचे बाहेरचे (डेकोरेटिव्ह) रेलिंग, प्लास्टर वगैरे तुटले. पण एकाही उंच इमारतींच्या मोठ्याल्या काचेच्या खिडक्या (फ्रेंच विंडोसारखा) खळकन्‌ फुटल्या नाहीत. आमच्या पाच मजली इमारतीच्या बाहेरील प्लॅस्टरला भूकंपानं कुठे कुठे तडे गेले, खोल्यांमध्ये ठेवलेलं सगळं सामान उभ्याचं आडवं झालं. पण इमारत कोसळून पडण्याची शक्यता फारच कमी होती.

या वेळचा भूकंप नेहमीपेक्षा खूप जास्त होता. त्यामुळे लवकरच धोक्याचा इशारे देणारे इमारतीतले सायरन वाजू लागले. ही आणीबाणीची सूचना आहे हे लक्षात आल्यावर सर्वांनी कामं थांबवली. (एरवी थोडा धक्का बसला की फक्त मिनिटभराची विश्रांती!) इमारतीला कुठलाही धोका उत्पन्न झाला (भूकंप, आग वगैरे) की धोक्याचे सायरन वाजू लागतात. ते वाजू लागताच इमारतीमधील मूलभूत सुविधा म्हणजे वीज, पाणी व गॅसपुरवठा आपोआप (स्वयंचलित यंत्रणेनं) बंद होतात. आधीच उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे जर विजेच्या तारा, पाण्याचे व गॅसचे पाईप तुटले असतील तर त्या गळतीतून पुढे शॉर्ट सर्किट, त्यामुळे लागणाऱ्या आगी, माणसांना होणारी इजा हे संभाव्य धोके टाळण्यासाठीच ही खबरदारीची योजना असते. याची सर्वांना आधीच कल्पना असल्यानं लोक कुठल्याही प्रकारचा गोंधळ माजवत नाहीत.

याखेरीज उपग्रह संदेशयंत्रणा बंद

करण्यात येते. त्यामुळे मोबाइल फोन, इंटरनेट सेवा काही काळापुरत्या बंद होऊन ते संदेश चॅनेल्स, पोलिस, अग्निशमन, रुग्णालये, सरकारी बातम्या, त्सुनामीचा आगामी इशारा देणारी यंत्रणा, बचावाचं कार्य करणाऱ्या हेलिकॉप्टर्सवरील संदेशयंत्रणा यासाठी उपलब्ध करून देण्यात येतात.

हे सगळे पूर्वसरावाचं व बरेचसं स्वयंचलित असल्यानं त्यात कुठलाही हलगर्जीपणा होत नाही. जपान हा भौगोलिकदृष्ट्या बेटांचा देश. चहुबाजूंनी समुद्रानं वेढलेला. त्यामुळे जपानमध्ये प्रत्येक वेळी मोठा भूकंप झाला की त्सुनामीची वॉर्निंग दिली जाते.

११ मार्चच्या भूकंपाची तीव्रता नोंदली जात असतानाच जपानच्या पूर्व किनाऱ्यावर येऊ घातलेल्या त्सुनामीची कल्पना यंत्रणेला आली. त्यानुसार किनाऱ्यालगतच्या लोकांसाठी उंच जागी जाण्याच्या सूचना त्वरेनं देण्यात आल्या. परंतु भूकंपकेंद्री ताशी ८०० किलोमीटर वेगानं निर्माण झालेल्या व जवळपास ताशी ३५०-४०० किलोमीटर वेगानं किनाऱ्यावर येणाऱ्या १० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या (म्हणजे साधारणत: इमारतीच्या तिसऱ्या मजल्याएवढ्या उंच) अक्राळविक्राळ सागरी लाटांच्या स्पर्धेत माणसं पळून पळून किती दूर पळणार? ते सुद्धा अवघ्या १०-१५ मिनिटांत! त्यामुळे धोक्याची पूर्वसूचना येऊनही किनारपट्टीवरचे हजारो लोक त्सुनामीच्या तडाख्यात सापडले. माणसेच काय, त्या प्रलयंकारी त्सुनामीत सापडलेल्या बोटी, मोटारी, घरं, इमारती, विमानं यांची काय अवस्था झाली ती जगभर सर्वांनी पाहिलीच. आम्ही त्यावेळी सेंडाई शहरात असलो तरी किनाऱ्यापासून दूर उंचावर होतो. सेंडाई हे टेकड्यांवर वसवण्यात आलेलं शहर आहे. (जपानचा एकंदरीतच जवळजवळ ८०% भूभाग हा डोंगराळ आहे.) त्यामुळे सेंडाईमधील जवळपास १० लाख लोकवस्तीपैकी बहुतेक लोक हे उंचावर राहतात. सुदैवानं त्यांना त्सुनामीचा फटका बसला नाही. पण पूर्व किनारपट्टीवरील मासेमारी आणि इतर सागरी व्यवसायाशी संबंधित असलेले लोक आणि त्यांच्या वस्त्यांना मात्र या रौद्रभीषण त्सुनामीनं गिळंकृत केलं.

हवामानखात्याच्या आधीच्या अंदाजानुसार ११ मार्चला संध्याकाळी सेंडाईमध्ये बर्फवृष्टी झाली. बाहेरील तापमान जसेजसं खाली उतरू लागलं तसा लोकांनी काढता पाय घेतला व सगळे घरी परतू लागले.

वीजपुरवठा बंद केल्यानं सर्व रस्त्यांवरील सिग्नलयंत्रणा पूर्णपणे बंद होती. पोलिसयंत्रणा मदतकार्यात गुंतलेली होती. विजेअभावी रेल्वे वाहतूक पूर्णत: ठप्प झाली होती. सगळे लोक एकाच वेळी घरी परतू लागल्यानं रस्त्यांवर वाहनांची हीऽऽ गर्दी उसळली. पण कुणीही हॉर्न वाजवत नव्हता, पुढे पुढे जाण्यासाठी धडपडत नव्हता, एकमेकांना शिव्यांची लाखोली वाहत नव्हता. सगळेजण सामंजस्यानं, खुणेनं एकमेकांना इशारे करत आपापल्या गाड्या अतिशय शिस्तीत परतीच्या दिशेने चालवत होते.

एरवी बसनं २०-२५ मिनिटांवर असलेल्या घरी परतायला त्या दिवशी मला दोन-अडीच तास लागले. कॅम्पसमधील एका भारतीय बाईच्या ओळखीने जपानी बाईच्या गाडीतून आम्हा दोघींना घरापर्यंत लिफ्ट मिळाली. थंडीचे दिवस असल्यानं संध्याकाळी पाच-साडेपाचलाच अंधार दाटतो. मी घरी पोचेपर्यंत सगळीकडे मिट्ट काळोख आणि रस्त्यांवर पांढराशुभ्र बर्फ.

मी राहत असलेली खोली इमारतीच्या पाचव्या मजल्यावर. वीज नसल्यामुळे लिफ्ट अर्थातच बंद. इमारतीच्या प्रवेशद्वाराशीच आमचा नेहमीचा चौकीदार व त्याच्या सोबतीला आलेले इतर जपानी भेटले. त्यांच्या सुचनेनुसार डोक्यावर हेल्मेट चढवून, हातात विजेरी धरून, जिन्यानं वर चढून खोलीत गेले. अंधारात त्या खोलीची अवस्था पाहून मन विषण्ण झालं. कपाटात, फडताळात ठेवलेल्या माझ्या सगळ्या वस्तू खाली पडून खोलीभर विखुरल्या होत्या. त्यातच फडताळाच्या सरकत्या काचा फुटल्यानं त्यांचा पसारा.

''खोलीत फार वेळ काढू नका, गरजेचं तेवढंच सामान घेऊन रात्री झोपायला जवळच्याच रेफ्युजी कॅंपमध्ये जा'' - चौकीदारानं बजावलेलं आठवून पटकन पैसे, पासपोर्ट व इतर महत्त्वाचे कागद, पाण्याची बाटली, थोडे सुके खाद्यपदार्थ, टेबलावरून खाली पडलेला लॅपटॉप असं सामान बॅकपॅकमध्ये कोंबलं. एका रिकाम्या हातात ब्लॅंकेटची वळकटी धरून आमची स्वारी पुन्हा पाच मजले उतरून खाली येताच मला काही इजा झाली नाही ना? याची चौकशी करून चौकीदारानं तसं त्याच्या नोंदवहीत लिहिलं आणि मी जवळच्याच रेफ्यूजी कॅम्पच्या दिशेनं पावलं वळवली.

रस्त्यातच माझ्या इमारतीत राहणारे ओळखीचे एक-दोन भारतीय चेहरे पाहून जरा हायसं वाटलं. आम्ही सर्वांनी रेफ्युजी कॅम्पमध्ये एकत्रच जाण्याचं ठरवलं. आतापर्यंत घरात, चार भिंतीच्या सुरक्षिततेत बसून, कधी कधी टीव्हीवर दाखवलेल्या, जगात इतरत्र झालेल्या भूकंप, त्सुनामी इत्यादीच्या बातम्या मी पाहिलेल्या होत्या. पण आजची रात्र मलाच रेफ्युजी कॅम्पमध्ये घालवायची आहे या विचारानं डोक्यात अनिश्चिततेचं काहूर माजलं. 'सिर सलामत तो पगडी पचास' असं स्वत:ला बजावत व एकमेकांना शाब्दिक धीर देत, आम्ही तिथे गेलो. जवळच असणाऱ्या एका जपानी शाळेच्या तळमजल्यावरील दोन हॉल रेफ्युजी कॅम्प म्हणून जाहीर करण्यात आले होते. मी राहत असलेल्या भागातील बरीच माणसं तिथे आधीच येऊन आपापले गट करून पथाऱ्या पसरून झोपेच्या तयारीत होती. मग आम्हीसुद्धा एका हॉलमध्ये अधेमधे उरलेल्या मोकळ्या जागेत, आजुबाजूच्या लोकांना विनंती करून, आमची ब्लॅंकेटस् पसरली. थोडे स्थिरस्थावर झाल्यावर हळुहळू रहिवाशांपैकी काही तरुण मुले स्वयंसेवक

म्हणून आपणहून पुढे सरसावली. त्यांनी कर्ण्यावरून सगळ्यांना सूचना देण्यास सुरुवात केली. तिथे जमलेल्या सर्व लोकांच्या सहकार्यानं एकंदरीत २०० किलो तांदूळ व साधारण तेवढंच पाणी जमल्याचं त्यांनी प्रथम जाहीर केलं. हे ऐकून सगळ्यांचा जीव भांड्यात पडला. पण यापुढे किती दिवस आपल्याला इथे राहावे लागेल याची कुणालाच खात्रीलायक माहिती नसल्यानं संयमानं वागण्याची विनंती केली.

त्या रात्री फक्त गरोदर स्त्रिया, छोटी बाळं, त्यांच्या आया आणि वयोवृद्ध (आजारी, व्हीलचेअरला खिळलेल्या) व्यक्तींनाच पाणी वाटप करण्यात आलं. इतर धडधाकट लोक गटागटानं आपापल्या घरी जाऊन अंधारात खाण्यापिण्याच्या गोष्टी शोधून घेऊन आले. जवळच असलेल्या एका जपानी किराणा दुकानातून आम्ही बिस्किटं, फळं, सुकामेवा, फळांचे अर्क - जे मिळेल व ताबडतोब खाता येईल असे पदार्थ विकत आणले. पोटभर खाण्याची कुणाचीच मन:स्थिती राहिली नव्हती. एवढ्यात थोड्या वेळाकरता माझा मोबाईल फोन सुरू झाला. घरी फोन लागत नव्हता. पण संदेश जात होता. लगेच संदेश पाठवला. ''मी सुखरूप आहे. इतर भारतीयांबरोबर रेफ्युजी कॅम्पमध्ये आले आहे.'' थोड्याच वेळात फोन पुन्हा बंद झाला.

रात्री उशिरा अखेर अतिथकव्यानं डोळा लागला. बाहेर हिमवृष्टी चालूच होती. त्या रात्री सेंडाईचे तापमान उणे ४ अंश सेल्सिअसपर्यंत उतरलं. अंगावर कपडे, स्वेटर्स, जॅकेटस् अशी ५-६ आवरणं असूनसुद्धा रात्री झोपेत सगळे कुडकुडत होते. दात वाजल्यानं, हातपाय वळल्यानं झोपमोड होत होती.

पहाटे सूर्यप्रकाश आल्यावर एकेक जण उठू लागला. थोड्याच वेळात स्वयंसेवकांनी सगळ्या गटांना जपानी वृत्तपत्रं वाटली. आता दिवसा उजेडी आम्हाला आमच्या आसपास असलेले इतर लोक स्पष्ट दिसले. आम्ही ४ भारतीय, २ आफ्रिकन, १ जर्मन व १ जपानी असा गट आदल्या रात्री तयार झाल्याचं जाणवलं.

त्यातील जपानी मुलीला आम्ही त्या जपानी वृत्तपत्रातल्या फोटोखालच्या मजकुरांचा सारांश सांगण्याची विनंती केली. तिनं दिलेली माहिती ऐकल्यावर व त्या वृत्तपत्रातील त्सुनामीच्या विध्वंसाची छायाचित्रं पाहिल्यावर आम्हाला परिस्थितीचा खरा अंदाज आला.

आज सकाळी मिळालेल्या त्या जपानी वृत्तपत्रात 'इशिनोमाकी' हे गाव त्सुनामीच्या तडाख्यात पूर्णत: उद्ध्वस्त झाल्याची चित्रं पाहिली. महिन्याभरापूर्वी पाहिलेलं प्रशांत महासागराचं ते भीतिदायक काळपट पाणी आठवलं व त्या सहकाऱ्याच्या मनातली भीतीची चाहूलही!

महिनाभरापूर्वी फेब्रुवारीतल्या एका रविवारी सहजच भटकंती म्हणून आम्ही चार सहकारी सेंडाईजवळच्या पूर्वकिनारपट्टीवर 'इशिनोमाकी' या ठिकाणी व पुढे बोटीनं तेथून जवळच असलेल्या 'ताशिरोजिमा' बेटावर गेलो होतो. हा माझा पॅसिफिक महासागरातला पहिला प्रवास होता. नवीन जागा बघण्याचा आनंद जरी वाटत असला तरी त्या प्रवासात पाहिलेला तो काळपट रंगाचा समुद्र व त्यात इतस्तत: विखुरलेली अनेक डोंगराळ, बर्फाच्छादित बेटं पाहून एक विचित्र भीतीदेखील वाटली होती. परतताना एक सहकारी म्हणालासुद्धा, की सध्या इथे सगळं शांत आहे म्हणजे बऱ्याच दिवसांत एकसारखे भूकंपाचे धक्के जाणवले नाहीत. त्यामुळे लवकरच काहीतरी होईल की काय असं वाटतं! काय ते नक्की माहीत नाही!

वास्तविक, आठवडाभरापूर्वी एकदा माझ्या मनातही असाच विचार येऊन गेला होता, की ''मी यावेळी सेंडाइला येऊन जवळपास दोन महिने झाले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या दोन महिन्यांत एकदाही भूकंपाचा धक्का जाणवला नाही.''

सेंडाई शहरात आम्ही भूकंप अनुभवला पण त्सुनामीपासून आम्ही सुरक्षित होतो. वीज, मोबाइल फोन बंद पडल्यानं आमचा बाहेरील जगाशी संपर्क तुटला होता. एव्हाना जगात सर्वांना टीव्ही, इंटरनेटवरून त्सुनामीची भीषण 'सॅटेलाईट चित्रं' दिसली होती. जे झालंय ते भीषण असणार याचा अंदाज आम्हाला आला होता, पण पूर्ण माहिती नव्हती.

जवळपास सगळेच रात्री अर्धपोटी राहिल्यानं व थंडीत चांगले कुडकुडल्यानं दुसऱ्या दिवशी सकाळी शाळेच्या मैदानावर जाळ पेटवून स्वयंसेवकांनी त्यावर नोरी (एक प्रकारची समुद्रवनस्पती) घालून भात शिजवला. रांगेत उभे राहिलेल्या सगळ्यांना प्रत्येकी एक मूद याप्रमाणे तो वाटण्यात आला.

खाऱ्या पाण्याचा (समुद्री माशासारखा) उग्र वास येत असलेला तो गरम भात चॉपस्टिकनं खाताना आपल्या ऋग्वेदातल्या 'अमृत' या संकल्पनेचा आणखी एक साक्षात्कार मला झाला. जपानी समजुतीनुसार नोरीला जितका जास्त खाऱ्या पाण्याचा वास येईल तितका तिचा दर्जा उत्तम. अशा बिकट परिस्थितीतसुद्धा सर्वांना शक्य तितक्या चांगल्या प्रतीची नोरी खाऊ घालण्याच्या जपानी वृत्तीचं कौतुक वाटलं.

जरा तरतरी आल्यावर आम्ही गटागटानं पुढच्या घासाची तरतूद करायला व एकंदरीत परिस्थितीचा आढावा घ्यायला हळुहळू बाहेर पडलो.

बरीचशी किराणा मालाची दुकानं चालू होती. जपानी लोक या दुकानांसमोर लांबच लांब रांगा करून उभे होते. वीज नसल्यानं काही दुकानांच्या आत अंधार होता. दुकानातील कर्मचारी वर्ग ५-१० लोकांच्या गटांना आत सोडत होता व विजेरीच्या प्रकाश दाखवून जमेल तितकी मदत करत होता. यात कसल्याही प्रकारचा गोंधळ वगैरे नव्हता. काही मोठाल्या दुकानांसमोर तर माणसे तीन-तीन तास रांगेत उभी असत. जसजसा दुकानातील अन्नसाठा संपत असे तसतशी ती दुकाने बाहेर तिष्ठत

असलेल्या लोकांची क्षमा मागून बंद करण्यात येत. अशा वेळी सुद्धा लोक दुसऱ्या दुकानांच्या शोधार्थ शांतपणे निघून जात. आरडाओरडा, शिव्या, धक्काबुक्की, दगडफेक, लुटालूट याचा कुठेही मागमूससुद्धा नव्हता.

हे सगळं पाहून आमचा धीर चेपला. भीषण नैसर्गिक आपत्तीचा अनुभव आपल्याला जपानसारख्या देशात यावा म्हणजे आपले मोठे भाग्यच म्हणायचं असं मनोमन वाटलं.

पुढचे तीन दिवस रेफ्युजी कॅम्पमध्येच राहिलो. या तीन दिवसांत शॉर्टसर्किटमुळे शेजारील शाळेच्या इमारतीच्या काही भागात आग लागल्यानं खबरदारीचा उपाय म्हणून आम्हाला एकदा रेफ्युजी कॅम्प बदलावा लागला.

एकीकडे जपानी आपत्कालीन तत्पर सेवांनी आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास कंबर कसली होती. त्यानुसार सेंडाई शहराच्या वेगवेगळ्या भागांतील इमारती, घरं यांची पाहणी सुरू झाली. कसलाच धोका नाही याची खात्री केल्यावर त्या त्या भागात वीज, पाणी सुरू करण्यात आलं.

मोठ्या भूकंपानंतर वारंवार येणारे धक्के (आफ्टर शॉक्स) चालूच होते. दोन-तीन वेळा मध्यरात्री आलेल्या मोठ्या आफ्टर शॉक्सनी (६.८ आणि ७ रिश्टर तीव्रता) सगळेजण दचकून जागे होत, आपापली हेल्मेट चढवून उभे राहत असत हॉलच्या बाहेर, पळण्याच्या तयारीत. पण लवकरच जमीन हलायची थांबल्यावर लोक पुन्हा आपापल्या जागी झोपी जायचे. काही जण मात्र अतिथकव्यानं तसेच पडून राहत. वैतागून म्हणत, ''आता कितीही भूकंप होऊ देत, अजिबात उठणार नाही. या भूकंपाच्या धक्क्यानं काही झालं नाही पण शांत झोपेअभावी आणि मानसिक तणावानं आपण नक्कीच आजारी पडू. आता काय व्हायचं ते होऊ दे. झोपुया बुवा!''

धडपणे खाणं-पिणं नाही, पाण्याअभावी दिवसाची आन्हिकं नाहीत, अती थंडी व आफ्टर शॉक्समुळे रात्रीची नीट झोप नाही. असे पुढचे किती दिवस चालणार याची कुणालाच कल्पना नाही. सगळ्यांच्याच डोक्यात विचारांचं, अनिश्चिततेचं काहूर माजू लागलं. पण लवकरच या गोष्टींचीसुद्धा सवय झाल्यागत वाटू लागलं. मनुष्यस्वभाव मोठा गमतीदार असतो.

अशा वातावरणात आजुबाजूच्या अनेकांशी ओळखी झाल्या. आधीच्या ओळखी अधिक वाढल्या. दुसऱ्या दिवसापासूनच आमच्याबरोबर असलेल्या एका आफ्रिकन मुलानं त्याच्याकडचं वायरलेस इंटरनेट अधुनमधून सुरू व्हायचं तेव्हा ते वापरण्याची संधी आम्हाला आलटूनपालटून दिली. जर्मन मुलानं त्याच्याकडे असलेली जास्तीची ब्लँकेट आम्हाला वाटून दिली. एका रशियननं त्याच्याकडचा चहा देऊ केला. चिन्यांनी शेकोटीवर तापवलेलं गरम पाणी देऊ केलं. आमच्याकडे असलेले खाद्यपदार्थ आम्ही इतरांबरोबर वाटून खाल्ले.

रस्त्यांतून चालत असताना भेटलेल्या अनेक अनोळखी जपान्यांनी त्यांच्याकडचं जास्तीचं पिण्याचं पाणी देऊ केलं. इंग्रजी बोलू शकणाऱ्यांनी काही मदत हवी असल्यास चौकशी केली. ज्यांचे मोबाईल फोन अधुनमधून सुरू असत त्यांनी घरी संदेश पाठवण्याची मुभा दिली.

जवळच असलेल्या जपानी दुकानदारांनी, बांगलादेशी रेस्टॉरंटवाल्यानं अनेकांना (जवळ फारसे पैसे नसलेल्यांना) उधारीवर दुकानातील खाद्यपदार्थ व असेल ते जेवण देऊ केलं.

असेच एकदा बोलत असताना जर्मन म्हणाला, ''सगळं सुरळीत चालू असतं तेव्हा आम्ही युरोपीय अतिशय शिस्तीनं व सुसंस्कृतपणानं वागतो. पण संकटसमयी युरोपातील परिस्थिती अतिशय खालावू शकते. पण इथे जपानमध्ये तसे काहीच घडत नाही. युरोपातील आमचं राहणीमान जर आम्ही 'अ' दर्जाचं मानलं तर जपानमधील राहणीमान 'अ++' मानावं लागेल. इथे इतका उत्पात घडला पण हे सगळे जपानी पूर्वीसारखेच वागताना दिसतात - अतिशय शिस्तबद्ध आणि संयमानं. जपान हा आजच्या काळात जगातला सर्वात सुसंस्कृत समाज म्हणायला हवा.''

भूकंप शुक्रवारी दुपारी झाला. शनिवारी संध्याकाळपर्यंत जर्मनीची rescue team जपानमध्ये दाखल झाली.

रविवारी सकाळी उठल्यावर हाच जर्मन आम्हाला शोधत निरोप घ्यायला आला. त्याला माहिती मिळाली होती की जर्मन नागरिकांना घेऊन जाण्यासाठी ही टीम रविवारी सेंडाईत दाखल होईल. सगळ्या जर्मन लोकांना टोकियोमध्ये नेण्यात येईल. ज्यांना ताबडतोब जर्मनीला निघून जावेसं वाटतं त्यांच्यासाठी Lufthansa तर्फे लगेच सोय करण्यात येईल. बाकीच्यांची टोकियोत काही काळ राहण्याची इच्छा असल्यास त्यांची तशी सोय करण्यात येईल.

हे सगळं आम्हाला सांगितल्यावर तो खूप उदास झाला. विचारल्यावर म्हणाला, ''मी दोन आठवड्यांपूर्वीच सेंडाईला आलो. माझं इथे पुढे ३ महिने कामानिमित्त वास्तव्य असणार होतं. या दोन आठवड्यात आणि आता भूकंपामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत मला इथे जो काही चांगला अनुभव आला त्यावरून मला इतक्यात इथून निघून जर्मनीला परत जाणं पटत नाही. बघू या, मी कदाचित पुढचे काही दिवस टोकियोत राहून सेंडाईला परतेनही.''

आमचं हे बोलणं चालू असताना मी एकीकडे माझ्याजवळ शिल्लक उरलेली बिस्किटं खात होते. मी सवयीप्रमाणे सहजच बिस्किटांचा पुडा त्याच्यासमोर धरला. त्यानं चमकून जाऊन दोन क्षण माझ्याकडे बघितलं. मी 'का नाही' या अर्थी स्मित हास्य केलं.

तो देखील खांदे उडवत हसला आणि म्हणाला, ''खरंच, का नाही? आता मी अतिपूर्वेकडील समाजात आहे आणि एवढं सगळं होऊनही मी इथे आरामात आहे.''

(जर्मन शिष्टाचारानुसार आपण खात असलेल्या अन्नातील वाटा समोरच्याला देऊ करणं हे कमीपणाचं समजलं जातं.) जपानी भूकंपानं अशा अनेक युरोपीयांच्या मनातली औपचारिकता मोडून काढली. रविवारी दुपारपर्यंत जर्मनीच्या rescue team तर्फे एक मोठी volvo बस सेंडाईमध्ये दाखल झाली. आधी सगळ्या जर्मन नागरिकांना त्यांच्या सगळ्या सामानासकट बसमध्ये बसवण्यात आलं. जर्मन नागरिक फारसे नसल्यानं बसमध्ये बऱ्याच मोकळ्या जागा उरल्या. मग पासपोर्ट तपासून हंगेरी, नेदरलँड या जर्मनीच्या शेजार देशांच्या नागरिकांना त्या बसमधून घेऊन जाण्याचं ठरलं.

थोड्याच वेळात स्वित्झर्लंडची rescue team त्यांच्या नागरिकांना घेऊन जाण्यास आली, त्यांच्या बसमध्येही जागा उरल्यानं स्वीस नागरिकांपाठोपाठ त्यांनी फ्रेंच, बेल्जियन व पोलीश नागरिकांना घेऊन जाण्याची तयारी दर्शवली.

रविवारी संध्याकाळी इंडोनेशियाचा झेंडा फडकावत दोन मोठ्या volvo बस दाखल झाल्या. तिथे राहत असलेल्या सगळ्या (शंभराहून अधिक) इंडोनेशियाच्या नागरिकांना त्यांच्या कुटुंबकबिल्यासह, सगळ्या सामानासकट घेऊन गेल्या.

रविवारी मध्यरात्रीच्या आसपास बांगलादेशचा झेंडा लावलेली एक बस आली आणि ज्या ज्या बांगलादेशी नागरिकांना सेंडाई सोडायची इच्छा होती, त्यांना घेऊन गेली.

हे सगळे बघून आम्ही भारतीय विचारात पडलो. रविवारी रात्री सामूहिक शेकोटीपाशी गप्पा सुरू झाल्या तेव्हा आमच्यातला एकजण खिन्नपणे म्हणाला, ''काय फरक पडतो? भारतात १०० कोटींपेक्षा जास्त लोक राहतात. त्यातले १०० सेंडाईत अडकले तर त्यांची पर्वा कुणाला?''

शेजारीच बसलेल्या, इंग्रजी जाणणाऱ्या काही चिनी मुलांच्या कानावर हे वाक्य पडल्यावर त्यातला एक उद्विग्नतेनं म्हणाला, ''तुम्ही तर फक्त १०० कोटी, आम्ही तर तुमच्यापेक्षा कितीतरी जास्त. आमच्यापैकी १००० जरी कुठे अडकले, तरी कुणाचं काही बिघडत नाही. शिवाय आमच्यातले बरेचसे तर चिनी जाचक व्यवस्थेला कंटाळून, पळून जपानमध्ये आलेले आहेत. ते कुठे जाणार?''

रविवार दुपारपासून फोन सेवा व इंटरनेटसेवा बऱ्यापैकी सुरू होऊ लागली होती. त्या आफ्रिकन मुलाकडचं वायरलेस नेटवर्क वापरून मी आणि इतर काही भारतीयांनी आपापल्या घरी ''आम्ही सुखरूप आहोत. काळजीचं कारण नाही'' असे इ-मेल पाठवले होते.

शनिवारी व रविवारी टोकियोतील भारतीय दूतवासाचं कार्यालय बंद असल्यानं कोणी फोन उचलत नव्हतं. सोमवारी सकाळी ९ वाजता टोकियोतील भारतीय दूतावासाचं कार्यालय सुरू झाल्यावर फोनवर फोन करून, प्रसंगी वाद घालून, अनेक प्रकारचे प्रयत्न केल्यावर भारतीय दूतावासाच्या मध्यस्तीनं आम्हाला गरज पडल्यास रात्री मुक्कामाची व एअर इंडियाला तिकिटासाठी विनंती करण्याची थोडी आशा जाणवल्यावर आमच्यातल्या २५ जणांच्या गटानं टोकियोला जाण्याचा निर्णय घेतला.

मंगळवारी सकाळी एक जपानी ड्रायव्हर त्याच्या व्हॅनमधून आम्हाला सेंडाईहून निघून 'साकाता' नावाच्या एका गावी घेऊन जाण्यास तयार झाला. सेंडाई जपानच्या उत्तर-पूर्व किनाऱ्यावर, तर 'साकाता' जपानच्या उत्तर-पश्चिम किनाऱ्यावर असल्यानं तिथे रेल्वेवाहतूक सुरू होती.

व्हॅन छोटी असल्यानं व त्यात जास्तीत जास्त लोकांना जागा मिळावी या हेतूनं आम्ही आमचं सामान मागेच ठेवण्याचा निर्णय घेऊन निघालो. पुढचा अख्खा दिवस सेंडाई-साकाता-निइगाता-टोकियो-योकोहामा असा प्रवास करून ती रात्र योकोहामात राहिलो.

टोकियो रेल्वेस्टेशनवर आम्ही भारतीय दूतावासातील दोघातिघांना भेटलो. त्यांच्या मध्यस्थीनं त्या रात्री आमची जेवण व मुक्कामाची सोय 'योकोहामा' इथं असलेल्या एका साई आश्रमात करण्यात आली. तिथे पोचल्यावर साई आश्रमाची व्यवस्था पाहणाऱ्या, टोकियोत गेली अनेक दशकं वास्तव्यास असलेल्या सिंधी व्यापारी संघटनेच्या कार्यकर्त्यांशी ओळख झाली. त्यांनी दिलेल्या भारतीय पद्धतीच्या गरम जेवणाचा पहिला घास तोंडात घालताच नकळत आम्हा सर्वांनी 'अन्नदाता सुखी भव'ची दाद दिली. जेवणानंतर गरम पाण्याच्या आंघोळीचा लाभ उठवून आम्ही त्याच आश्रमातील देवालयात गेलो. फारशी देवळात जाण्याची सवय नसलेल्या आम्हा सगळ्यांना तिथे लावलेल्या उदबत्त्या, धुपाच्या सुवासानं बरं वाटलं. शांत चित्तानं झोपण्याची तयारी सुरू झाली असतानाच पुन्हा एक भूकंपाचा धक्का जाणवला. काहीजण घाबरून खोलीबाहेर जाण्याच्या तयारीनं पुन्हा उभे राहिले.

पण तिथल्या लोकांनी आम्हाला दिलासा देऊन शांत झोपण्याची विनंती केली. त्याच्या दुसऱ्या दिवशी, १६ मार्चला टोकियोच्या नरीता विमानतळावरून विमान पकडलं.

परतीच्या प्रवासात आमच्या ग्रुपमधील एकजण खूप उदास झाला. म्हणाला, ''मी सेंडाईमध्ये गेली तीन वर्षं राहतोय. यावर्षी मार्चअखेरीस माझ्या कामाची मुदत संपून मी भारतात परतणारच होतो. परतायला फक्त वीसच दिवस उरले होते. स्वप्नातही कधी वाटलं नाही की अशा विचित्र अवस्थेत मला सेंडाईमधून निघावं लागेल. गेल्या तीन वर्षांच्या माझ्या इथल्या वास्तव्यात मला खूप चांगले अनुभव आले. त्याला शेवटी गालबोट लागलं याचं खूप वाईट वाटतं. इथल्या सुरक्षित वातावरणाची खूप सवय झाली आहे. इथल्या लोकांची शिस्त, कामसू वृत्ती आतापर्यंत माझ्याही अंगवळणी पडली आहे. आता भारतात परत

गेल्यावर आपला कसा काय निभाव लागणार याची काळजी वाटते.''

फुकुशिमा इथल्या चार अणुभट्ट्यांचं भूकंपानं जे नुकसान झालं त्याची चर्चा जगभर सुरू झाली व अजून बराच काळ चालू राहील. पण सेंडाईपासून दक्षिणेला साधारण ९० ते १२० किलोमीटर अंतरावर असलेल्या या भट्ट्यांमधील प्रारणांचा (रेडिएशनचा) धोका आम्हाला फारसा नव्हता.

या अणुभट्ट्यांच्या आसपासच्या ३० किलोमीटर त्रिज्येच्या परिघातल्या जवळपास २ लाख लोकांना पहिल्या ३० तासांतच सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं होतं. त्या बाहेरील आणखी १०-२० किलोमीटर त्रिज्येच्या परिघातल्या लोकांसाठी वेळोवेळी जपानी रेडियोवरून काळजी घेण्याबद्दल सूचना जाहीर करण्यात येत होत्या.

रविवारी दुपारनंतर आमची फोनसेवा बऱ्यापैकी सुरू झाल्यानं जगभरातील लोकांबरोबर संभाषणे सुरू झाली. अनेक प्रकारच्या माहितीमुळे संभाव्य प्रारणांच्या धोक्याबद्दलची काळजी आम्हालाही वाटू लागली. यावर तोडगा म्हणून आम्ही आपापल्या प्रयोगशाळेमधल्या जपानी प्राध्यापकांशी संपर्क साधला. त्यांच्याकडून खात्रीलायक माहिती मिळाली की सेंडाईमध्ये तो धोका नाही. सेंडाईत आम्ही सुरक्षित आहोत. पुन्हा एकदा या सगळ्या नैसर्गिक आपत्तींचा अनुभव आपल्याला जपानसारख्या देशातच यावा याबद्दल बरं वाटलं.

मुख्य भूकंपानंतर वारंवार हलके धक्के जाणवतात. यावेळी झालेल्या मुख्य भूकंपाची तीव्रता खूप जास्त असल्यानं त्यानंतर येणारे धक्के साधारणत: महिनाभर सुरू राहतील व त्यांची तीव्रताही जास्त (६ ते ७ रिश्टर) असेल असा अंदाज वर्तवला जात होता.

खबरदारीचा उपाय म्हणून टोहोकू विश्वविद्यालयाचे सर्व पूर्वनियोजित कार्यक्रम एप्रिल अखेरपर्यंत रद्द करण्यात आले. ज्या कुणाला आपल्या आप्तस्वकीयांना भेटायचं असेल त्यांनी जावं म्हणून परवानगी जाहीर करण्यात आली.



## अभिनंदन

**'निरर्थकाचे पक्षी'** या काव्यसंग्रहास कवयित्री नीरजा यांना या वर्षीचे केशवराव कोठावळे पारितोषिक मिळाले आहे.

## आशीर्वाद पुरस्काराचे मानकरी

उषा धर्माधिकारी – **अपंगांच्या यशोगाथा : जीवन त्यांना कळले हो**
अनुराधा गांगल – **आजीच्या गोष्टी**
संपादक : सुदेश हिंगलासपूरकर – **गांगल ७० ग्रंथाली ३५**
अनुराधा कुलकर्णी – **वन फॉर सॉरो**
दि.य. देशपांडे – **विवेकवाद**
भगवान इंगळे – **भिडू**
संकलन : दिलीप चावरे – **महाराष्ट्राचा लेखाजोखा**
अनुराधा गोरे – **वारस होऊ अभिमन्यूचे**
डॉ. उज्ज्वला (रेगे) दळवी – **सोन्याच्या धुराचे ठसके**
शरयू घाडी अर्थात प्रसादची आई – **पंखाविना भरारी**
दीपक घारे – **चिं.त्र्य. खानोलकर**
आदिनाथ हरवंदे – **लालबाग**
अरुण शेवते – **आईच्या कविता**

वास्तविक हिरोशिमा, नागासाकी इथं दुसऱ्या महायुद्धात झालेल्या आण्विक संहारात होरपळलेला जपान हा जगातला एकमेव देश आहे. पण केवळ या कारणामुळे जपान्यांना अणुभट्ट्यांची भीती वाटत नाही. पुरेशी खबरदारी घेऊन बांधण्यात आलेली एकूण ५४ आण्विक ऊर्जाकेंद्रं जपानमध्ये आहेत.

सपाट जमिनीचा अभाव त्यामुळे शेती बेताचीच. अशा भौगोलिक परिस्थितीत औद्योगिक प्रगती हा एकमेव मार्ग आहे हे ओळखून जपाननं दुसऱ्या महायुद्धानंतरच्या गेल्या ७० वर्षांच्या काळात प्रगतीची इतकी मोठी भरारी घेतली की आज जगातला औद्योगिकदृष्ट्या सर्वाधिक प्रगत देश म्हणून त्याचा नावलौकिक सर्वज्ञात आहे.

भूकंप, त्सुनामी, ज्वालामुखी अशा नैसर्गिक आपत्तींशी सामना करण्याचं प्रशिक्षण लहानपणापासूनच घेतलेल्या जपान्यांमध्ये यावेळीसुद्धा प्रचंड भीतीची भावना नव्हती. भूकंपानं जपानचं सर्वात मोठं 'होंशू' बेट यावेळी चांगलंच हादरलं पण जपानी मन नेहमीप्रमाणेच अविचल होतं. आल्या संकटाचा सामना करण्याची, त्यातून पुन्हा नव्याने सगळं उभारण्याची तयारी शांतपणे सुरू झाली होती. भूकंप शुक्रवारी दुपारी झाला. सोमवारपासून ज्यांना शक्य होतं असे सगळे जपानी आपापल्या कार्यालयात रुजू झाले. आपापल्या कामांच्या जागी पडलेला पसारा आवरण्याच्या, मोडलेल्या गोष्टी दुरुस्त करण्याच्या कामांत ही सगळी प्रजा पुन्हा एकदा गढून गेली. जगभरातल्या तत्त्वज्ञानात सांगितलेलं 'work is worship' आणि आपल्या गीतेत म्हटलेलं 'कर्मण्ये वाधिकारस्ते' इथे प्रत्यक्षात बघायला मिळालं.

**डॉ. स्वाती सोमण**
३/५३, एम.आय.जी. कॉलनी,
राजावाडी, विद्याविहार (पूर्व),
मुंबई ४०० ०७७

## सांस्कृतिक ठेवा

# नाशकात पोथ्यांचे इ-ग्रंथालय...

**वंदना अत्रे**

धर्मक्षेत्र असणाऱ्या नाशिक शहरात याज्ञिकी करणारा दिनेश वैद्य पोथ्यांच्या डिजिटायझेशनचे काम झपाटल्यासारखा करत असून, त्याने पोथ्यांमधील दोन लाख फोलिओंचे (दोन पृष्ठे मिळून एक फोलिओ) डिजिटायझेशन केले आहे. तेही सर्व साधनसामग्री स्वखर्चाने खरेदी करून! नाशकात त्याला सर्वांत पहिली निकड जाणवली ती या ज्ञानभांडाराची जपणूक करण्याची.

स्थापत्यशास्त्रापासून धर्मशास्त्रापर्यंत आणि वैद्यकशास्त्रापासून उच्चारशास्त्रापर्यंत अनेक ज्ञानशाखांची मांडणी, टिप्पणी ह्या पोथ्यांमध्ये आढळते. अशा पोथ्या संगतवार लावून त्यांच्या देखभालीचे काम दिनेश वैद्य, अनिता जोशी आणि त्यांच्या मित्रांनी हाती घेतले आहे. त्यांची वये आहेत ३० ते ३५ या टप्प्यातील....!

दिनेश डोळसपणे, अभ्यासपूर्ण रीतीने शब्दोच्चारांकडे बारकाईने लक्ष देणारा असा व्यावसायिक आहे. त्याचा कटाक्ष पूजेतील साधनसामग्रीच्या आटोपशीर वापरापासून ते पूजेच्या सुबक-देखण्या मांडणीपर्यंत असतो. चार पीठांच्या शंकराचार्यांनी ज्यांचा 'वैदिक सम्राट' म्हणून गौरव केला त्या श्रीकृष्णशास्त्री गोडसे यांच्याकडून त्याने याज्ञिकीचे शिक्षण घेतले. त्यामुळे धर्मशास्त्रातील विविध पूजा, त्यांचे औचित्य या वाटेने तो या पोथ्यांकडे कुतूहलाने वळला.

नाशिकमध्ये किमान एक लाख पोथ्या उपलब्ध आहेत. सावाना, सुभाष वाचनालय अशा संस्थांकडे तीस-पस्तीस हजार पोथ्या आहेत. बाकी पोथ्या या विविध घरा-घरांमधील वैयक्तिक संग्रहात आहेत. सर्वांत मोठा संग्रह आहे बावीसशे पोथ्यांचा, तात्याशास्त्री गर्गे यांचा. तात्याशास्त्रींच्या घरातील पोथ्या दुर्मीळ ऐवजाप्रमाणे सांभाळल्या जातात. त्यांची वर्षातून एकदा पूजा होऊन गुंडाळलेली कापडे बदलली जातात. पण त्यांना बाकी घरांमधून पोथ्या कशाबशा बासनात बांधून ठेवलेल्या आढळल्या. दिनेशच्या टीमने त्या उघडून, विशेष ब्रशने साफ करून त्यांची पाने संगतवार लावणे आणि गहाळ पानांची नोंद करणे असे काम आधी केले. सर्व पोथ्यांची नोंदणी एका विशिष्ट पद्धतीच्या मध्ये केली. त्यात पोथ्यांचा काळ-शक, संवत, पोथीचा विषय, पोथ्यांची पाने किती ती संख्या, गहाळ पानांची संख्या आणि पोथी ज्याच्याकडे आहे त्याचा नाव-पत्त्यासह तपशील याची नोंद असते.

पोथ्यांची काही वैशिष्ट्ये आहेत. त्या देवनागरी व मोडी लिप्यांमध्ये आहेत. त्या संस्कृत, प्राकृत व मराठी भाषांत आहेत. त्या बोरूने लिहिल्या आहेत, त्यासाठी वापरली गेलेली शाई बाजरीचे कणीस अथवा बिब्बा जाळून त्यात तिळाचे तेल किंवा डिंक घालून केलेली असल्याने पोथी पाण्यात बुडवली तरी ती शाई ओघळत, पसरत नाही. पोथ्या लिहिण्यासाठी वापरला गेलेला कागद कापसाचा लगदा किंवा भूर्जपत्राचा भुगा यांत तुरटीचे पाणी घालून, मग लादून केलेला असल्याने दीडशे वर्षे उलटून गेली तरी तो फाटलेला नाही आणि या पोथ्यांमधील अक्षर! सुबक, नेटके, जराही खाडाखोड नाही की अक्षरांचा आकार बदललेला नाही! रेखीव दंड आणि मोत्यांची माळ गुंफावी तशा सरळ लिहिलेल्या ओळी. दोन्हींकडील समास मोजून-मापून सोडावे तसे. कधी, संपूर्ण पोथीला सुंदर किनार रेखलेली किंवा कधी, तेवढीच रेखीव चित्रे, आकृती जागोजागी पेरलेल्या. एखाद्या पोथीला अस्सल सोन्याचा तलम मुलामा दिलेला (मध सोन्यात खलून!). प्रत्येक पान टापटिपीने रेखलेले, वाचताना मन प्रसन्न व्हावे असे. पोथ्यांच्या या बाह्यरूपाएवढेच, किंबहुना त्यापेक्षाही कितीतरी पटींनी अधिक लखलखीत त्यांतील ज्ञानसौंदर्य. ते ओळखू शकणाऱ्या मूठभर शहाण्या माणसांमध्ये दिनेशची गणना करावी लागेल. म्हणून त्याने स्वतःच्या खिशातून जवळजवळ दीड लाख रुपयांची गुंतवणूक करून डिजिटायझेशनचे काम हाती घेतले आहे. डाटा सिक्युरिटीसाठी डीव्हीडीमध्ये हा सगळा संग्रह ठेवण्यात येणार आहे. दीड ते दोन जीबी साईझचा एक फोलिओ असतो. अभ्यासकांची गरज लक्षात घेऊन एक फोलिओ किमान वीस पट मोठा, एनलार्ज करून वाचता येईल अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

दिनेश 'यज्ञसंस्था आणि व्यवस्थापन' या विषयाच्या डॉक्टरेटसाठी अभ्यास करत आहे. दिनेशला या पोथ्यांमधील विविध विषयांनी एवढे झपाटले आहे, की एखाद्या याज्ञिकी कामासाठी जरी त्याला फोन केला तरी संभाषणाची गाडी तिसऱ्या मिनिटाला 'पोथी' या विषयाकडे सहजपणे वळते आणि त्याच्याबरोबरच्या पिशवीत कोणत्या ना कोणत्या निमित्ताने हे 'दुर्मीळ धन' असतेच!

# मी आणि माझे समाजजीवन

# मी, माझे समाजजीवन आणि माझी साडेतीनशे नातवंडे

**सुधीर नाईक**

मी मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलो, वाढलो व तसाच आहे. खाऊन-पिऊन सुखी; शिक्षणात बऱ्या डोक्याने वावरलो. मोठ्या न् खोट्या इच्छा-आकांक्षा कधीच मनात आल्या नाहीत. माझे वडील, माझ्या वयाच्या सतराव्या वर्षी गेले - एवढे एक दुःख सोडले तर फारशा अडचणी नाहीत. आई होती. मोठा भाऊ व वहिनी, दोघांनी कधी कसली अडचण पडू दिली नाही. काका-मंडळीही नेहमी विचारत आली. एम.ए.नंतर स्टेट बँकेत नोकरी मिळाली. यथावकाश लग्न. सुविद्य पत्नी, एक मुलगा, एक मुलगी. मध्येच नोकरी सोडून वकिली चालू केली. मुलांची शिक्षणे पूर्ण झाली. पाठोपाठ, त्यांची लग्ने पार पडली. मोजून चार वेळा आजोबा झालो. याच काळात नैसर्गिक शेती या विषयाशी ओळख झाली. मग झाडे लावणारा झाडकरी होऊन संकल्प सोडला- ''आयुष्याच्या प्रत्येक दिवसामागे एक झाड लावणे. मी शंभर वर्षे जगणार, म्हणून निदान छत्तीस हजार पाचशे झाडे

---

प्रत्येक पोथी आणि त्यातील प्रत्येक ओळ ही सांभाळून ठेवलीच पाहिजे असा आग्रह धरणे कितपत योग्य? अशा खोचक प्रश्नाचे उत्तर देताना, दिनेश थेट आपल्या डोळ्यांत बघत उलट विचारतो, हे ठरवण्यासाठी का होईना या पोथ्या वाचायला, बघायला हव्यात ना? नाशिक-मधील अनेक कुटुंबांनी आपल्याकडील 'पोथ्यांचे बाड' गोदावरीच्या पात्रात सोडून दिले आहे. त्यांच्याबरोबर काय ज्ञानसंशोधन वाहून गेले हे कसे सांगता येईल? आणि मग तो त्याच्या हाती लागलेल्या पोथ्यांमधून दिसलेले संशोधनाचे फक्त कवडसे किती चकित करणारे आहेत याचे अनुभव सांगू लागतो.

भास्कराचार्यांनी सातव्या शतकात लिहिलेल्या 'लीलावती' या गणिताच्या ग्रंथावर टिप्पणी करणारी सोळाव्या शतकातील एक पोथी आहे. व्यास मोजण्याच्या पद्धती, त्रिज्येवरून त्रिज्या मोजणे, वर्तुळ, काटकोन-त्रिकोण या 'लीलावती'मध्ये मांडल्या गेलेल्या संकल्पनांची उकल पोथीत मांडली गेली आहे. गणिताचा विषय निघाला तेव्हा स्वाभाविक उल्लेख झाला, 'शूल्भसूत्र' म्हणजे दोरीच्या अंगाने येणाऱ्या भूमितिसूत्रांचा. यज्ञकुंड बांधण्यासाठी या सूत्रांचा वापर करण्यात यावा असे पोथीत म्हटले आहे. एखादा यज्ञ यजमानांना फलदायी व्हावा म्हणून यज्ञकुंड बांधताना ते कसे बांधावे? तर यजमानाने पायाचे अंगठे टेकून, हात वर करून उभे राहायचे. त्यांच्या उंचीवरून त्यांचे हस्तप्रमाण काढायचे, हस्तप्रमाणाचे पाच भाग करून त्यांचे अंगुलप्रमाण काढायचे; असे मोजमाप अधिकाधिक सूक्ष्म होत, थेट रेणूपर्यंत गेलेले या पोथीत वाचायला मिळते. मान्सार ग्रंथामध्ये स्थापत्यशास्त्राची चर्चा विस्ताराने आहे, ती इतकी बारकाईने, की बल्लचांना टेकू देताना मेढी कशी दिली म्हणजे वरचे, दुसऱ्या मजल्यावरचे बांधकाम टिकेल असा विचार त्यात आहे. होयसर, बुंदेलखंडी, मान्सार, हेमाडपंथी अशा विविध स्थापत्यशैलींची चर्चा या पोथीत आहे, तर अग्निपुराणात आकाशगंगा किती आहेत, किती अंतरावर आहेत, सूर्य किती आहेत याची चर्चा आहे आणि 'ग्रहलाघव' पोथीत ग्रहांमधील अंतरे, धूमकेतू किती आहेत. किती अंतराने ते पृथ्वीवरून दिसतात हे मांडले आहे. दिनेशचा आपल्या घरीच पोथ्यांचे इ-ग्रंथालय उभे करण्याचा मानस आहे कोणाही अभ्यासकाला आपल्या अभ्यासासाठी या सेवेचा लाभ घेता येईल. या वर्षीच्या अखेरपर्यंत किमान चार हजार पोथ्या डिजिटाईज करण्याचा त्याचा संकल्प आहे.

**दिनेश वैद्य**
संपर्क ९८२२०२९१९८
**वंदना अत्रे**
संपर्क : ९९६०८००२५८

**दिनेश वैद्य यांच्या या कामगिरीबाबत थिंक महाराष्ट्र डॉट कॉम या वेबसाइटवर लेख येताच सर्वत्र औत्सुक्य निर्माण झाले. वैद्य यांस आर्थिक साहाय्य करावे या हेतूने काही लोक नाशिकला जाऊन त्यांना भेटले. तेव्हा वैद्य सहज बोलून गेले, की हे काम अफाट आहे. एकट्या नाशकात सुमारे एक कोटी पोथी-पाने डिजिटाइज करावी लागतील. पैठण, सातारा, वाई अशा ठिकाणी तर हस्तलिखित पोथ्यांचा मोठाच खजिना मिळेल. महाराष्ट्रातील हा पुरातन वारसा राखावा कसा? वाचकांनी प्रतिक्रिया कळवाव्या.**

**thinkm2010@gmail.com**
**दिनकर गांगल**
**ए/३अजिंक्यतारा, सीएसटी रोड,**
**चेंबूर, मुंबई ४०००७१.**

माझ्या नावे, व घरात वाढते कुटुंब म्हणून साडेतीन लाख झाडे लावणे व वाढवणे, तीही नैसर्गिक शेतीच्या पद्धतीने.'' हे आपले कर्तव्य असे समजून सध्या राहत असतो. अद्यापपर्यंत सत्तावन्न हजार झाडे असा माझा स्कोअर झालेला आहे. कुंपणाने सुरक्षित केलेली कुठलीही जमीन ही आपली कर्मभूमी, त्यावर योग्य ती झाडे लावायची. त्याच कामासाठी म्हणून, आमच्या कुटुंबावर माया करणाऱ्या नलिनी शेरे यांच्या वृक्षप्रेमामुळे, मी अहमदनगर एमआयडीसी-तील स्नेहालय या संस्थेत येणे-जाणे करू लागलो. त्यांची तीस एकर जागा. तेव्हा तेथेच मुक्काम ठोकून, झाडांबरोबर अनाथ मुलांसाठीही काही काम करुया असा विचार मनात येऊ लागला. त्यात अचानक माझ्या पत्नीचे आजारपण उद्भवले. तेव्हा मला जाणवले, की काही सामाजिक काम करायचे असेल तर ते आताच! करणे अधिकाधिक कठीण होत जाईल. कारण आपले शरीर धडधाकट असतानाच काही काम होईल. नंतर आपण परावलंबी होत जाणार. म्हणजे फक्त भाषणबाजी! मुंबईतले माझे वास्तव्य खूपच सुखाचे. चांगला, हवा-उजेड असलेला फ्लॅट!

नेहमी गप्पा-गोष्टी-गाणी यांसाठी वेळ काढणारी मंडळी! खाणे-पिणे, मौज-मजा, सोसायटीच्या गच्चीवर कुंड्यांमधून, सभासदांचा हिरवा कचरा वापरून; वेगवेगळी झाडे, वेली लावण्याचे काम चालू केले; लायब्ररीतून पुस्तके आणून वाचायची, सकाळ-संध्याकाळ वॉक घ्यायचा. या सर्वांत वेळही मस्त जात होता, पण नंतर लक्षात येऊ लागले, की आपण आतून कुठेतरी कुजत चाललो आहोत. मुख्य म्हणजे नातवंडे भेटली नाहीत तर कुढायला व्हायचे. काहीसे डिमांडिंग होत चाललो आहोत. पत्नीकडून, मुलाकडून, लग्न झालेल्या मुलीकडून, सर्वच नातवंडांकडून इतरांकडून आपल्या अपेक्षा वाढताहेत. त्या पुऱ्या करणे त्यांना शक्यच होणार नाही. वाल्या कोळ्याला नारद भेटल्यानंतरची स्थिती! ठीक नव्हती. सगळीकडून ओरबाडून खाल्ले जाणारे सुख! ते पचत नव्हते. माझे, माझे म्हणत त्याचेच ओझे होऊ घातले. हे सुख स्वतःहून इतरांना वाटले नाही तर ते कुजून जाईल. अढीत ठेवलेला, पिकलेला आंबा नाही का माझं माझं म्हणत करत राहण्यापेक्षा, ज्यांना गरज आहे त्यांना काही वाटले गेले तर अधिक बरे. फांदीवर लटकलेला पिकलेला आंबा इतरांच्या कामी येतो. अनेक जीव-चिलटे, माश्या, पक्षी, वारा त्या आंब्याचा सुगंधी दरवळ लुटायला येतात. आणि मग केव्हातरी तो पिकलेला-रसभरा आंबा कृतकृत्य होऊन जमिनीवर अलगद पहुडतो, मातीत मिसळून जातो, तोच मुळी आनंदाचे आणखी एक झाड होण्यासाठी!

मग मनाचा हिय्या केला, मुंबईतला फ्लॅट भाड्याने दिला व त्यातून येणाऱ्या भाड्याच्या जीवावर, अहमदनगर एमआयडीसी येथील 'स्नेहालय' या संस्थेत स्वयंसेवक म्हणून सपत्नीक दाखल झालो. सज्जनांनी नुसते सज्जन असून चालत नाही. त्यांनी एकत्र येऊन काही सकारात्मक काम उभे केले तरच जगाचे भले होऊ शकेल असे म्हटले जाते. म्हणूनच, स्नेहालयाच्या कामात खारीचा वाटा उचलायचा असे ठरवले. आता मागे वळून पाहिल्यानंतर घेतलेला निर्णय योग्य ठरला असे म्हणायला हरकत नाही!

नगरला आल्यानंतर हिरव्या पानांची झाडे लावताना, 'आनंदाची झाडे' केव्हा लावू लागलो ते कळलेच नाही! 'स्नेहालय' हा अनाथाश्रम आहे. साडेतीनशे अनाथ मुला-मुलींचे पालन तेथे केले जाते. त्यांपैकी अर्धी मुले ही एचआयव्ही+ आहेत. एड्स झालेल्या आई-वडिलांची ही मुले! जन्मतः एड्‌सबाधित!! स्वतःची कुठलीच चूक नसताना हा रोग घेऊन जगात प्रवेश केलेली. त्यांचे आई-वडील एड्सने गेले, म्हणून इतर कुटुंबीयांनी दूर लोटलेली. सर्व नातेवाईक असूनही अनाथ! या रोगाची लागण झाल्याने मनात सदोदित सल घेऊन वावरणारी. माझ्या नशिबी हे का? असा भाव चेहऱ्यावर वागवणारी ही मुले!

साडेतीनशे अनाथ मुलांचे राहणे, खाणे-पिणे, कपडे, शिक्षण, दुखणीबाणी, सर्व सांभाळून निगुतीने जोपासना करणारा पासष्ट-सत्तर जणांचा स्टाफ. असा हा प्रचंड डोलारा, मोठ्या हिमतीने व तळमळीने सावरणारी ट्रस्टी मंडळी- सर्वश्री ज्यांच्याकडे आधीच भरपूर आहे अशांना अधिक देण्याचा अट्टाहास गिरीश कुळकर्णी, सुवालाल सिंगवी ऊर्फ बापूजी व मिलिंद कुळकर्णी... सर्व मंडळी पारदर्शक. जनसेवा हीच ईश्वरसेवा हे विवेकानंदांचे ब्रीदवाक्य प्रमाण मानून त्याप्रमाणे चालणारी. अनाथ मुलांना केंद्रबिंदू ठेवून त्यासाठी अनेक योजना आखणारी व पॉझिटिव्ह मंडळींना सांभाळणारी.

हे सर्व मला जमणारे नव्हते; आपण फक्त इथली झाडे सांभाळुया, जे करायला त्यांच्याकडे वेळ नाही, असे म्हणून आम्ही इथे आलो. पण इथे आल्यावर इथल्या मुला-मुलींनी आम्हांला आजी-आजोबा म्हणून केव्हा नोंदवून घेतले ते समजलेच नाही. स्नेहालयात मुलांचे राहणे, खाणे-पिणे, अभ्यास यांची चांगली सोय पाहिली जाते, पण त्या पलीकडे जे मुलांना हवे असते ते देण्यासाठी इथल्या स्टाफकडे वेळ उरत नसतो. घरी आपण दोन मुलांना सांभाळू शकत नाही, इथे तर प्रत्येकाला वीस-बावीस मुले सांभाळावी लागतात. त्यातच स्टाफची दमछाक होते. या मुलांची भावनिक जोपासना करायला आमचा वेळ उपयोगी पडू लागला असावा. दररोज एक ना एक मुलाची गोष्ट सांगता येईल असे इथे घडत असते. मुलांना हव्या असणाऱ्या गोष्टी अगदी छोट्या असतात. पण त्या मुलांनी सांगायच्या कुणाला???? कुणाला??

एक फुगा, एक गोळी, कधी अवेळी लागलेली भूक, शाळेतून आणायला सांगितलेला विशिष्ट कागद, चित्र, पेन इत्यादी; जवळ येत जाणारा वाढदिवस, मित्राला द्यावीशी वाटणारी भेट, छोटासा बॉल. टीव्हीवरच्या ॲडमध्ये दाखवलेली पेपरमिंटची गोळी, झोपताना वाटणारी

भीती, दुखणारे पोट, वाढत्या वयातील गोंधळून टाकणाऱ्या समस्या एक ना दोन. वस्तू प्रत्यक्षात मिळो वा न मिळो, पण निदान ती मागायला वा सांगायला हक्काचे स्थान म्हणून ही मुले आमच्याकडे येऊ लागली. मांडीवर हात ठेवून, खांद्यावर हात ठेवून गप्पा मारू लागली. हळूच पाठीमागून येऊन डोळे झाकू लागली. त्यांच्या भांडणाचा निकाल लावायला सांगू लागली. 'मी आजोबांना नाव सांगीन' म्हणून आपसात दम देऊ लागली. एकदा, एका मुलाला दोन मुले त्वेषाने ठोसे देत होती. मारणारी मुले शांत स्वभावाची म्हणून मला ठाऊक होती. मी त्यांना अडवले, 'अरे, मारता कशाला त्याला?' तर दोघांनीही एकदम सांगितले, तो नं तुम्हांला म्हातारा म्हणाला.मी त्यांना म्हटले की त्यात काय झाले? म्हातारा तर म्हातारा. मी आहेच मुळी म्हातारा. त्याला कशाला मारता? तेव्हा ती दोन्ही मुले मलाच दम दिल्यासारखी म्हणाली, ''नाही. तुम्ही 'म्हातारे' नाहीत. तुम्ही तर 'आजोबा' आहात!'' असा मी खराखुरा आजोबा झालो! अद्यापपर्यंत मी फक्त वयाने आजोबा होतो.

त्यानंतर मी अधिक डोळसपणे पाहू लागलो. तेव्हा माझ्या लक्षात आले, की माझ्यासारख्या किमान पंधरा स्वयंसेवकांची इथे गरज आहे. तरच या सर्व मुलांचे भावनिक पोषण नीट होऊ शकेल. पुढे जाऊन ते सुजाण नागरिक म्हणून वावरू शकतील. आपापसातील रागद्वेषांवर, मत्सरावर मात कशी करायची, हे त्यांना कसे कळणार? त्यांना जे हवे ते सांगायचे तरी कुणाला? ही एक पोकळी भरून काढण्यासाठी तरी अशा आजी-आजोबांची गरज आहे. मधूनच पाठीवर थाप पडली की ती कृतकृत्य होतात. चांगले मार्क्स मिळाले की धावत सांगत येतात. त्यांनी स्वतः लिहिलेली गोष्ट, गाणे, निबंध, कविता ऐकवण्यासाठी त्यांना कुठले तरी स्थान हवे असते. शाळेत जाण्यासाठी स्कूल-बस आहे, पण निघताना टाटा करायला कुणी नको का?

आमचा वेळ या साऱ्यांत जातो. माझ्या उतरत्या वयात मी कुणाच्या तरी उपयोगी पडतोय ही जाणीव/भावना मला आनंद देऊन जाते. घरी बसून चार नातवंडांची आठवण काढत बसणारा मी, आता नातवंडांची संख्याच वाढवून बसलोय. साडेतीनशे नातवंडे!

अ-ठ-ढ च्या गोळ्या वेळेवर घेतल्या तर एच.आय.व्ही.बाधित मुले पस्तीस-चाळिसाव्या वर्षांपर्यंत सर्वसाधारण आयुष्य जगू शकतात. थोडीशी उत्तेजनापण त्यांना जगायला प्रचंड बळ देऊ शकते, हे माझ्या लक्षात आले आहे. माझ्यासारख्या अनेक रिकामटेकड्यांना अशा कामात भाग घेऊन आपल्या वानप्रस्थाश्रम अर्थपूर्ण करता येईल!

हे काम वय विसरायला लावते, आनंद देते व मुलांनाही आनंद मिळतो. ज्यांना गरज आहे अशा अनाथ मुलांना तुमचा वेळ द्या. त्यांच्यासाठी करण्याजोगी अनेक कामे तुम्हाला आपोआप सापडतील. त्यांना परवचा, रामरक्षा, मनाचे श्लोक, गीताई, गाणी, चुटके, नाटुकली, गृहपाठ इत्यादी शिकवता येईल. स्वच्छतेचे धडे देता येतील. नाक कसे शिंकरायचे? कपडे, नखे, चेहरा, शरीर, केस, डोळे यांची कशी घ्यायची? कसे जेवायचे? नीट जेवणे म्हणजे काय? अन्नाची नासाडी का करायची नाही? अक्षर कसे सुधारावे? देण्याची गरज आहे. पुढे जाऊन जगात कसे व का वागावे याची जाण देण्याचे काम आपण नक्की चांगल्या प्रकारे करू शकतो. हे काम एक-दोन तास लेक्चर देऊन होणारे नाही. त्यासाठी लागणारा वेळ हा फक्त सेवानिवृत्त देऊ शकतात. अनाथ मुलांना घर ही संकल्पनाच नसते. त्यामुळे प्रत्येकाला हाताळण्यासाठी वेगवेगळे तंत्र विकसित करावे लागते. एका मुलाला नासाडी करण्यात मौज वाटत असे. पक्ष्यांची घरटी मोडा, वस्तू मोडा, फांद्या तोडा, चादरींवर थुंका. त्याला मारून-झोडूनही उपयोग होत नव्हता. मग त्याला विचारायला सुरुवात केली. 'काय घरटं मोडल्यावर कसं मस्त वाटलं, नाही रे? ती पिल्ले खालती पडून चिवचिवाट वह्या-पुस्तके, पेन-पेन्सील, दप्तरे यांची काळजी कशी घ्यायची? कसे जेवायचे? नीट जेवणे म्हणजे काय? अन्नाची नासाडी का करायची नाही? अक्षर कसे सुधारावे? - एक ना दोन, अनेक त-हेचे संस्कार देण्याची गरज आहे. पुढे जाऊन जगात कसे व का वागावे याची जाण देण्याचे काम आपण नक्की चांगल्या प्रकारे करू शकतो. हे काम एक-दोन तास लेक्चर देऊन होणारे नाही. त्यासाठी लागणारा वेळ हा फक्त सेवानिवृत्त देऊ शकतात. अनाथ मुलांना घर ही संकल्पनाच नसते. त्यामुळे प्रत्येकाला हाताळण्यासाठी वेगवेगळे तंत्र विकसित करावे लागते. एका मुलाला नासाडी करण्यात मौज वाटत असे. पक्ष्यांची घरटी मोडा, वस्तू मोडा, फांद्या तोडा, चादरीवर थुंका. त्याला मारून-झोडूनही उपयोग होत नव्हता. मग त्याला विचारायला सुरुवात केली. ''काय घरटं मोडल्यावर कसं मस्त वाटलं, नाही रे? ती पिल्ले खालती पडून चिवचिवाट करताहेत ते ऐकून कसा आनंद वाटतो, नाही रे? इतरांच्या चादरींवर थुंकले की तोंड कसे स्वच्छ होते, नाही का? त्याची मोटार मोडली, तो रडल्यावर किती गंमत आली, नाही का? - चल, आपण इतरांना सांगुया. हळूहळू तो मुलगा निवळला.

मुलांच्या सहवासात आपणही लहान होत जातो. वाढत्या वयाची जाणीव होत नाही. या मुलांना गोंजारताना आपली दुखणी कशी निघून गेली तेही समजत नाही. आपली कुणालातरी गरज आहे, आपण त्याला हवेहवेसे वाटतो, त्याला आवडतो - एवढी एकच गोष्ट जगण्यासाठी उमेद द्यायला पुरेशी आहे. मी हे स्वतः अनुभवतोय म्हणूनच सांगतो.

सेवानिवृत्तांनी, स्वत:च्या तब्येतीची काळजी करत कुढत बसण्यापेक्षा, काहीतरी सकारात्मक कामाला हातभार लावायला हवा. त्यानेच 'आयुष्या'चे रूपांतर अर्थपूर्ण 'जीवना'त होईल.

**सुधीर नाईक**
भ्रमणध्वनी : ९३२०२७००२२

# संस्थाजीवन ‘थिंक महाराष्ट्र’ प्रकल्प

**थिंक महाराष्ट्र डॉट कॉम**

**हेतू –** समाजातील विधायकतेची शक्ती नेटवर्क करणे आणि योग्य कारणांसाठी तिचा वेळोवेळी प्रेशरग्रूप म्हणून उपयोग करण्याची शक्यता अजमावणे. विधायकता ही व्यक्ती किंवा संस्था या कोणाही मार्फत व्यक्त होत असल्याने या दोन्हींना नेटवर्कचे भागीदार होता येईल.

**कार्य –** वाढत्या ‘ग्लोबल’ वातावरणात आपले ‘लोकल’ स्वरूप झपाट्याने नष्ट होत असल्याची भावना

जगभर, देशोदेशी आहे. आपणास ‘थिंक महाराष्ट्र’मार्फत महाराष्ट्रीय समाजापुरता या भावनेचा आदर करून या प्रदेशाचे व संस्कृतीचे संचित जपण्याचे उपक्रम हाती घेता येऊ शकतील आणि असे काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांचे कार्य समाजासमोर सातत्याने मांडता येईल.

**प्रकल्पाचे काम तीन आघाड्यांवर होईल**

१. महाराष्ट्राचे संचित अधोरेखित करणे.

२. मराठी माणसाची गुणवत्ता व चांगुलपणा यांचे नेटवर्किंग करणे, म्हणजेच विधायकता जोपासणे.

३. समाजात वेळोवेळी जे सामाजिक, सांस्कृतिक प्रश्न उद्भवतील त्या संबंधात योग्य जनमत घडवण्यासाठी प्रेशरग्रूप म्हणून काम करणे.

**प्रकल्पाचे लाभधारक –** महाराष्ट्राशी आपुलकीचे व सततचा बंध असलेले नाते जपणारी कोणतीही व्यक्ती या प्रकल्पाची भागीदार होऊ शकेल व म्हणून ह्या नेटवर्कशी जोडून घेतली जाईल. मराठी कोणास म्हणावे? – हा बिकट असा प्रश्न आहे. त्यासाठी उत्तरही देता येत नाही. हा प्रश्न दोन पातळ्यांवर सोडवावा लागेल. एक– ताबडतोबीचे उत्तर. दोन–सखोल अध्ययनानंतरचे उत्तर.

१. ताबडतोबीच्या उत्तरासाठी महाराष्ट्रात राहतात व मराठीची आस्था बाळगतात ती आणि जगभर असलेली व मराठी बोलतात ती मराठी माणसे होत असे धरून चालायला हरकत नाही.

२. सखोल अध्ययनासाठी ‘एक्झिट पोल’ धर्तीची पाहणी महाराष्ट्रभर विद्यापीठातील मराठीच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांमार्फत करता येईल. ही पाहणी सहा ते आठ महिन्यांच्या अवधीत उरकणे गरजेचे

आहे. त्यासाठी बऱ्यापैकी खर्च येऊ शकेल व तो परवडेल तेव्हा पाहणी हाती घ्यावी, परंतु त्यातून सुनील गावसकर यांच्या मुलाला (रोहन) किंवा यश चोप्रा यांना मराठी म्हणायचे की नाही अशासारखे जे प्रश्न पडतात त्याचे कायमस्वरूपी उत्तर मिळून जाईल.

**प्रकल्पाची भाषा -** मराठी, मराठी–कम–इंग्रजी, अपवादात्मक परिस्थितीत निव्वळ इंग्रजी.

**प्रकल्पाची व्याप्ती –** महाराष्ट्रास मायभूमी वा कर्मभूमी मानणारा जगभरचा समुदाय.

मराठी माणसात जसा संकोच आहे तसा न्यूनगंडही आहे. त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे महाराष्ट्राचे विद्यमान कर्तृत्व आपल्याला माहीत नसते. उलट, महाराष्ट्रात इतिहासात रमण्याची (शिवाजी, पेशवे यांची थोरवी गात बसण्याची) वाईट खोड आहे. त्यातूनही न्यूनगंड जोपासला गेला आहे. दुसरे असे, की समाजातील गुणवत्ता (शिक्षण, क्रीडा, व्यवसाय–वृत्ती वगैरे क्षेत्रांतील) जोपासण्याची आखीव अशी व्यवस्था महाराष्ट्रात नाही. त्यामुळे येथे कर्तृत्व बहरले ते योगायोगाने, त्या त्या व्यक्तीच्या सक्षमतेने. त्याचीदेखील यथायोग्य सामाजिक नोंद होत नाही. कधी कधी ते प्रकाशात येते; तथापि, तो झोत दूर झाला, की पुन्हा कर्तृत्व सामाजिक अज्ञानांधकारात लुप्त होते. यावर मात म्हणून कर्तृत्वाची कायम स्वरूपाची आणि सतत अद्ययावत होत असलेली नोंद करणे, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे. कर्तृत्वाच्या अशा नोंदीमुळे समाजाला आधार तर लाभेलच, परंतु तरुण वर्गाला ते प्रेरणास्थान होईल. कर्तृत्वाची नोंद फक्त जिवंत व शक्यतर वयाच्या सत्तरीआधीच्या व्यक्तींची चार पातळ्यांवर करायची आहे. हे कर्तृत्व वेगवेगळ्या किंबहुना सर्व क्षेत्रांतील गृहीत धरले आहे.

१. जिल्हापातळी – जिल्ह्यात गाजलेले, राज्यात माहीत असलेले लोक.

२. राज्यपातळी – राज्यपातळीवर प्रभाव टाकू शकणा–या आणि देशभर माहीत असलेल्या व्यक्ती.

३. राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय पातळी –पद्म पुरस्काराने सन्मानित व राष्ट्रपातळीवर परिचित व्यक्ती.

२.स्वयंसेवी संस्थांचा ताळेबंद – महाराष्ट्राची ताकद कार्यकर्त्यांत आहे असे गांधीजी म्हणत. कर्नाटकाला सात ज्ञानपीठ पुरस्कार मिळाले तर महाराष्ट्राला सात मॅगसेसे ॲवॉर्ड मिळणे स्वाभाविकच ठरले. महाराष्ट्रभर स्वयंसेवी संस्थांचे जाळे आहे. त्यांचे काम, त्यांचे कार्यकर्ते, त्यांचे अर्थकारण ह्यांचा वस्तुनिष्ठ लेखाजोखा मांडू शकलो व त्या क्षेत्रातील घडामोडी नित्य कळवू शकलो तर ते महत्त्वाचे काम होईल. संस्थांनाही अधिक बळ लाभेल.

‘ताळेबंद’मध्ये संस्था व व्यक्ती यांच्या कार्याची वस्तुनिष्ठ, विश्वासपात्र मांडणी असेल. त्यामधून संस्था व एकूण समाज यांचे नाते निर्माण होईल, ती या उपक्रमाची जमेची बाजू असेल.

३. माहिती कोष – मराठी समाज आणि संस्कृती या संबंधातील माहितीचे तालुकानिहाय संकलन.

थिंक महाराष्ट्र डॉट कॉम ही वेबसाइट ‘व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन’ ह्या कंपनीमार्फत चालवली जाते. कंपनीची स्थापना ना नफा तत्त्वावर कलम २५ अनुसार करण्यात आली आहे.

# आमचे पुस्तक मित्रमंडळ – एक अनुभव

## सुधीर दांडेकर

''हल्ली कोणी वाचतच नाही'' असे
म्हणणारी माणसे भेटतात.
पुस्तक विकत घेऊन वाचणारी मराठी
माणसे खूप कमी असतात,
मग एवढे प्रकाशक कसे उगवतात? व ते
कसे काय जगतात?
कुछ तो गोलमाल है।
कुछ तो गोलमाल है।

वरील पद्यसदृश गद्यात जे प्रश्न निर्माण केले आहेत ते प्रश्न सामान्यत: सर्व मराठी माणसांना पडलेले असतात. येत्या २५ वर्षांत मराठी भाषा मरणार ह्या भीतीने मराठी माणूस सदैव घाबरलेला असतो. (तरीसुद्धा तो स्वत:च्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालतो कारण जगात मुलगा मागे पडू नये!) मराठी भाषेसाठी आपण काहीतरी केले पाहिजे असे त्याला नेहमी वाटत असते आणि त्या वाटण्यातून तो गुपचूप पुस्तके विकत घेत असतो, वाचत असतो. परंतु भाषिक न्यूनगंडातून ह्याची फारशी वाच्यता होत नाही अशी माझी धारणा आहे. असो.

मराठी भाषा वाचवण्यासाठी व एकूणच वाचनाची गोडी निर्माण होण्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे ह्या सार्वत्रिक वेडाने मी व माझे मित्र प्रकाश लवेकर पछाडले होतो असे म्हणावयाला हरकत नाही. ह्या वेडातूनच आम्ही 'पुस्तकभिशी' ही कल्पना राबवण्याचे ठरवले. वाचनप्रेमी व्यक्तींचा एक ग्रुप करून, दरमहा १०० किंवा २०० रुपये प्रत्येकी वर्गणी काढून, जमा झालेल्या पैशांतून पुस्तके खरेदी करायची व ती ग्रुपमध्ये एकमेकाला वाचण्यासाठी सर्क्युलेट करायची. वर्षाच्या शेवटी प्रत्येक सभासदाची जेवढी रक्कम जमा झालेली असेल तेवढ्या किमतीची पुस्तके सभासदाला देऊन, त्या वर्षाचा हिशोब पूर्ण करून नवीन वर्षाची सुरुवात करायची ह्या साध्यासोप्या व्यवस्थेवर चालणारे 'अक्षरवेध पुस्तकमित्र मंडळ' आम्ही चालू केले. पहिल्यांदा दर १५ दिवसांनी वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा करण्यासाठी मीटिंग घ्यायची असे ठरवले होते पण ते शक्य झाले नाही. आता महिन्यातून एकदा भेटून चर्चा करतो. ही चर्चा खूप लांबत असल्यामुळे घरी (म्हणजे बायको) आरडाओरडा होतो पण आम्ही त्याकडे दुर्लक्ष करतो. असो. पहिल्या वर्षी १२ सभासद होते परंतु बऱ्याच जणांनी विचारणा केल्यामुळे दुसऱ्या वर्षी सभासदांची संख्या १५ केली. सभासदांची संख्या जास्त वाढवल्यास, पुस्तके, पैशाचा हिशोब ठेवणे व सभासदांशी संपर्क साधणे थोडे गैरसोयीचे होते असा अनुभव असल्यामुळे आम्ही सभासदांचा आकडा मर्यादित ठेवला.

खरे म्हणजे 'अक्षरवेध पुस्तकमित्र मंडळ' हा पुस्तकभिशीचा दुसरा अवतार आहे. ह्या मंडळाच्या आधी आमचे 'पालघर पुस्तकप्रेमी मंडळ' ह्या नावाचे ३० जणांचे मंडळ होते. हे मंडळ चालू करण्यात आमच्याशिवाय सतीश राऊत ह्यांचासुद्धा क्रियाशील सहभाग होता. वरील मंडळात महिला सभासदांचा सहभाग लक्षणीय होता. वरील दोन्ही मंडळे चालवताना जे अनुभव आले ते पुढे नमूद करत आहे.

१. समाजात पुस्तके वाचण्याची इच्छा असणाऱ्यांची संख्या आपल्याला वाटते त्यापेक्षा बरीच जास्त आहे. परंतु पुस्तकाच्या दुकानात जाऊन पुस्तक विकत घेण्याएवढी तीव्र इच्छा असणारे मात्र कमी आहेत. अनेकांना आपल्या आवडणाऱ्या विषयावरची पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत ह्याचीच कल्पना नसते असे दिसून आले आहे.

२. हल्ली सर्वांनाच तयार माल वापरण्याची सवय झालेली आहे. पैसे टाका माल उचला अशी सर्वांची वृत्ती झालेली आहे. (लोकहो! फास्टफूडचा जमाना आहे. शालेय विद्यार्थ्यांनासुद्धा तयार उत्तरे हवी असतातच की.) त्यामुळे सहजगत्या थोड्या श्रमात पुस्तके मिळत असतील तर लोक नक्की पुस्तके विकत घेतात. पुस्तके लोकांपर्यंत पोचली तर काय होते ह्याचा प्रत्यक्ष अनुभव नमूद करण्यासारखा आहे. 'जव्हार' हे ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील तालुक्याचे ठिकाण आहे. ह्या गावात स्टेशनरी विकणाऱ्या दुकानात मला पानिपत, अग्नीपंख अशा धर्तीची १०-१२ पुस्तके ठेवलेली आढळली. मला जव्हारमध्ये ह्या प्रकारची पुस्तके पाहून आश्चर्य वाटले. अधिक चौकशी करता असे कळले की वरील प्रकारच्या पुस्तकांच्या प्रत्येकी १५ ते २० प्रती त्या दुकानदाराने विकलेल्या आहेत.

३. पुस्तक मंडळाचे सभासद घेताना ज्यांच्या आवडी एकाच प्रकारच्या आहेत असे सभासद निवडा म्हणजे पुस्तकांची निवड करणे खूप सोपे जाते. नाहीतर आमच्या आवडीची पुस्तके तुम्ही आणतच नाही असा

नाराजीचा सूर निघतो व मंडळाचे कार्य मंदावते. आमच्या पहिल्या मंडळात मोठ्या प्रमाणावर महिला सदस्य असल्यामुळे पुरुष व महिलांच्या आवडीत फरक पडला. त्यामुळे आम्ही 'अक्षरवेध पुस्तकमित्र मंडळा'त महिला सभासद घेतले नाहीत व त्यांना त्यांचे स्वतंत्र मंडळ स्थापन करण्यास सांगितले.

४. सर्वसाधारणपणे सभासदांचा 'मोकळा वेळ' एकच असावा. त्यामुळे मीटिंगची वेळ ठरवण्यात अडचण येत नाही. मीटिंगला जास्तीत जास्त सभासदांची उपस्थिती खूप उपयुक्त असते. ह्या बाबतीत सुद्धा महिला व पुरुष हा भेद अडचणीचा ठरतो. कारण संध्याकाळी ५ ते ७ हा महिलांचा मोकळा वेळ असतो तर पुरुषांचा मोकळा वेळ रात्री ८ नंतर चालू होतो.

५. सहकार हा पुस्तक मंडळे कार्यरत राहण्यातील महत्त्वाचा घटक आहे. आम्ही पैसे देऊ. तुम्ही पुस्तके आणा. आम्ही ती वाचू. अशा वृत्तीचे सदस्य कमीत कमी असावेत. पुस्तके आणणे, पैशांचा हिशोब ठेवणे, पुस्तकांना कव्हरे घालणे वगैरे कामे पाळीपाळीने केली तरच मंडळ चालू शकते. नेहमी २-३ सभासदांवरच सारखे काम पडल्यास ते सदस्य कंटाळून जातात व परिणामी मंडळाचे काम थंडावते.

६. नवीन प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांचा मागोवा ठेवणे, निरनिराळ्या प्रकाशकांकडून नवीन पुस्तकांची यादी मागवणे किंवा प्रकाशकांची पुस्तकांची माहिती देणारी मासिके निघत असतात त्याचे वर्गणीदार होणे. वर्तमानपत्रात अनेक पुस्तकपरीक्षणे येत असतात ती वाचून आपल्या सदस्यांना आवडतील अशा पुस्तकांची माहिती सदस्यांना करून देणे अशी कामे करणारा किमान एकतरी सदस्य मंडळात असणे जरुरीचे आहे. असा तज्ज्ञ जागल्या असल्यावर मंडळ निरोगी राहते.

७. बऱ्याच वेळा आपल्याला एखादा विषय आवडू शकतो ह्याचीच स्वत:ला जाणीव नसते त्यामुळे नवीन विषयाकडे आपण वळत नाही. परंतु आवर्जून एखाद्या वेगळ्या विषयाचे पुस्तक घ्यावे. 'कॉंक्रिटचे किमयागार', 'उस्मानाबादची साखर' व 'हा तेल नावाचा इतिहास आहे', ही थोडी वेगळ्या विषयाची माहिती देणारी पुस्तके घेतली व ती आमच्या सभासदांना आवडली.

८. वर्षाच्या शेवटी पुस्तक वाटप करताना काही पुस्तके बऱ्याच सभासदांना हवी असतात. अशा वेळी चिठ्ठ्या टाकून आम्ही प्रश्न सोडवतो. एक-दोन पुस्तके अशी असतात, की त्यांना कोणीच वाली नसतो. अशा वेळी मन मोठे करून त्या पुस्तकांना दत्तक घेणारे विशाल मनाचे सभासद सुद्धा आमच्या मंडळात आहेत. त्यामुळे कुरबुरी न होता आमचे मंडळ नीट चालले आहे.

वर 'दत्तक' ह्या शब्दाचा उल्लेख आलेला आहे. त्यावरून सहज आठवण झाली की म्हातारपणी मुलांपेक्षा पुस्तकेच माणसाला जास्त आधार देतात. फक्त ती वाचण्यासाठी डोळे शाबूत राहिले पाहिजेत. पुस्तके आपल्याला अनेक गोष्टी मिळवून देतात. मित्र, मानसन्मान, विरंगुळा वगैरे. गेल्या वर्षी बोलीभाषा दिनाच्या निमित्ताने एका कार्यक्रमाला गेलो होतो. त्या कार्यक्रमात वाडवळी बोलीभाषेवर अशोक सावे ह्यांचे भाषण ऐकले. भाषण मला आवडले त्यामुळे कार्यक्रमानंतर मी त्यांना भेटलो. त्यांच्याशी थोडी चर्चा झाली. त्यातून भाषाअभ्यासक विश्वनाथ खैरे व त्यांच्या पुस्तकांचा विषय निघाला. खूप गप्पा झाल्या व अशोक सावे हे माझे खूप जुने मित्र आहेत इतकी गहिरी मैत्री झाली. गेल्या वर्षभरात त्यांच्याशी अनेक भेटी झाल्या, फोनवर बोलणे झाले. मजा आली. ह्या मैत्रीला निमित्त विश्वनाथ खैरे ह्यांची पुस्तके व समान आवड. पुस्तके वाचक आणि लेखक दोघांना आनंद देतात. आमच्या मंडळाचे एक सभासद संजय कोटेजा ह्यांना डॉ. रामाणी ह्यांचे 'ताठ कणा' हे पुस्तक खूप आवडले. कोटेजा ह्यांनी डॉ. रामाणींना पत्र लिहून तसे कळवले. डॉ. रामाणी ह्यांनीसुद्धा वाचकाचा आदर राखून उलट पत्र पाठवलेच, शिवाय त्यांनी लिहिलेले दुसरे पुस्तक भेट म्हणून पाठवून दिले. दोघांनाही आनंद झाला. असाच अनुभव व्यंकटेश कामत ह्यांच्या बाबतीतसुद्धा आला. 'इडली, ऑर्किड आणि मी' ह्या त्यांच्या पुस्तकाकाबाबत पत्र लिहिल्यावर तर त्यांचा मला फोन आला व माझे त्यांच्याशी प्रत्यक्ष बोलणे झाले व नंतर भेटणे झाले. तुम्ही जर ट्रेनमध्ये उभे राहून पुस्तक वाचत असाल तर बसण्यासाठी जागा मिळण्याची शक्यता खूप वाढते. खरोखर प्रयोग करून बघावा पुस्तक वाचणाऱ्याबद्दल समाजात आदराची भावना अजून टिकून आहे हे मोठेच भाग्य होय. पूर्वी माणसाच्या शिक्षणाचा दर्जा पुस्तकांच्या संख्येवर ठरत होता- ''अहो, तो चांगला चार बुकं शिकलेला आहे'' असे एखाद्याच्या शिक्षणासंबंधीचे वर्णन असे.


आमच्या मंडळाचे एक सभासद सतीश कुळकर्णी लोकल ट्रेनमध्ये मनाच्या श्लोकांचे पुस्तक 'बसून' वाचत होते. शेजारचा प्रवासी उत्सुकतेने त्या पुस्तकात डोकावून वाचत होता. थोड्या वेळाने त्या शेजारच्या माणसाने कुळकर्णींना विचारले, तुम्ही कोणते पुस्तक वाचत आहात? तो पुढे म्हणाला, की मी केरळी आहे पण शिक्षण मुंबईत झाल्यामुळे मला मराठी वाचता येते पण अर्थ नीट कळत नाही. त्यामुळे तुम्ही काय वाचताहात ते जरा समजावून सांगता का? कुळकर्णी ह्यांनी मनाच्या श्लोकांविषयी थोडी माहिती देऊन दोन श्लोकांचा अर्थ सांगितला ते ऐकून तो म्हणाला, मला ह्या श्लोकांचे इंग्रजी ट्रान्सलेशन मिळेल का? तुम्ही माझा फोननंबर लिहून घ्या व भाषांतर मिळाले तर मला लगेच कळवा. 'जय जय रघुवीर समर्थ!' आहे की नाही गंमत? वरील गोष्टीवरून आठवण झाली की महाराष्ट्राचे जे समृद्ध संतवाङ्मय आहे त्याची इतर भाषकांना खूप भुरळ पडते असा माझा अनुभव आहे. एका डॉक्टरेट झालेल्या तामीळ अमेरिकनाला मी ज्ञानेश्वरीचे इंग्रजी भाषांतर वाचण्यास दिले तेव्हा ते वाचून तो इतका भारावून गेला की, सबंध दिवस तो ते पुस्तक

घेऊनच हिंडत होता. असो. पुस्तके तुम्हाला खूप काही देऊन जातात. आपल्याकडून काही घेत नाहीत. बंगाली भाषेत 'घरातील पुस्तकांची कपाटे म्हणजे घराचे अलंकार आहेत' असे म्हटले जाते, हे काही खोटे नाही.

आता थोडे आमच्या अक्षरवेध पुस्तक मित्र मंडळाच्या वैशिष्ट्यांविषयी लिहितो. वय वर्षे ८६ ते वय वर्षे ३५ अशा विस्तृत वयोगटातील व्यक्ती आमच्या मंडळात आहेत. माजी आमदार व ८६ वर्षाचे वयोवृद्ध सामाजिक नेते नवनीतभाई शहा आमच्या मंडळाचे सदस्य आहेत. वाचनदृष्टच्या नवनीतभाई खूपच तरुण आहेत. तीन गुजराती व्यक्ती आमच्या मंडळात आहेत. हे तिघे गुजराथी मराठी सभासदांपेक्षा जास्त मराठी पुस्तके वाचतात. वर्षाच्या शेवटी गावातील इतर वाचनप्रेमींसाठी एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीचे व्याख्यान आम्ही आयोजित करतो. लेखक व मंडळाचे सभासद ह्यांच्यात संवाद असाही कार्यक्रम आम्ही करतो. प्रसिद्ध लेखकदांपत्य फिरोझ रानडे व प्रतिभाताई रानडे ह्यांच्याबरोबर सभासदांची चर्चा घडवून आणली. ठाण्याच्या साहित्य संमेलनाआधी ग्रंथाली प्रकाशनासोबत पुस्तकप्रदर्शन आयोजित करण्यात आम्ही बरीच मेहनत घेतली. एकूण काय, जेवढा उत्साह तेवढे उपक्रम असे साधेसोपे गणित आहे. अशा उपक्रमांमुळे वाचनसंस्कृती वाढण्यास मदत होते. शिक्षण ही एक तलवार आहे. वाचन माणसाला ह्या तलवारीचा योग्य उपयोग करण्यास शिकवते अशी आमची धारणा आहे म्हणून आम्ही सगळा खटाटोप करतो. दर महिन्याला नवीन पुस्तके वाचायला मिळण्याचा आनंद काही वेगळाच आहे. ह्या आनंदापुढे मंडळ चालवण्याचा खटाटोप सार्थकी लागला असे वाटते. महिन्यातून एकदा का होईना जी चर्चा होते ती खूप मजेशीर असते व त्यामुळे सदस्यांत मित्रता वाढते. घरात सारखी नवीन पुस्तके येत असतात त्यामुळे विशेषत: मुले पुस्तके वाचतात. ह्या सर्व गोष्टींचा विचार करता 'पुस्तक मंडळ' जरूर काढावे.

**सुधीर दांडेकर**
पुष्पहास बंगला, शारदा हॉस्पिटलजवळ,
माहीम रोड, जि. ठाणे,
पालघर-४०१४०४
भ्रमणध्वनी : ९८२३१३३७६८

**१० मे रोजी प्रसिद्ध होत आहेत...**




**आचंद्र-सूर्य नांदो... - अनुराधा गोरे**

भारत १९४७ साली स्वतंत्र झाला. मात्र ते समाधान फार काळ टिकलं नाही. १९४७च्या ऑक्टोबरमध्येच पाकिस्ताननं काश्मीरवर आक्रमण केलं आणि पुढे एक नवी युद्धमालिका भारताला लढावी लागली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजवर जी युद्धं झाली त्यांची थोडक्यात माहिती आणि या युद्धांमध्ये लढताना भारतीय जवानांनी एकेक डावपेच पूर्णत्वास नेण्यासाठी लावलेली जीवाची बाजी यांचं वर्णन करणारं हे पुस्तक.
जवानांच्या खडतर जीवनाची आजवर न आलेली, छोट्या छोट्या घटनांची ही कहाणी...

**मूल्य १६० रु. सवलतीत १०० रु.**




**गाऊ त्यांना आरती - अनुराधा गोरे**

खुली-छुपी युद्धं, नैसर्गिक कोप किंवा कोणतीही आपत्ती त्यांच्या मनोबलावर मात करू शकत नाही. अशा दुर्दम्य इच्छाशक्तीचे आपले सैनिक, सैनिकी दलं, युद्धप्रसंग आणि घटना यांची माहिती देणारं हे पुस्तक...

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

अस्सल मुंबईकरांचे आत्मकथन

# ‘मुंबैच्या संगे आम्ही (बि)घडलो’

## मंदाकिनी देशपांडे

‘अरेबियन नाईट्स’मध्ये एकीतून दुसरी, दुसरीतून तिसरी गोष्ट निघत राहते, तशीच या आत्मकथनातही एकातून दुसरी, तिच्यातून तिसरी अशी आठवणींची मालिकाच सुरू होते. त्या आठवणी स्पष्ट आहेत, चित्रदर्शी आहेत, व्यक्तिगत आहेत, पण सामाजिक संदर्भ घेऊन आल्या आहेत. लेखकाच्या इंग्लिश-मराठी-संस्कृत भाषांतील साहित्याच्या सखोल वाचनाचे आणि संगीतप्रेमाचे दाखले त्यात पानोपानी विखुरलेले आहेत. त्या अभ्यासाचे संस्कार लेखकाच्या शैलीवर झालेले आहेत. या सर्व गुणविशेषांमुळे डॉ. सुधाकर प्रभूंचे ‘मुंबैच्या संगे आम्ही (बि)घडलो’ हे आत्मकथनात्मक पुस्तक रोचक झाले आहे.

डॉ. प्रभूंचे बरेचसे आयुष्य ‘मुंबै’तच गेले आहे. लालबाग-परळपासून एकीकडे फोर्ट-चर्चगेट आणि दुसरीकडे दादर-माहीमपर्यंत त्यांचा संचार झाला आहे. महत्त्वाचे हे, की हा संचार म्हणजे कामधंद्यासाठी केलेला बस-लोकलचा प्रवास नाही. लहानपणी उनाड मित्रमंडळींसोबत, पुढे कधी शिक्षणासाठी, कधी मैफलींसाठी अशा अनेक कारणांनी पण मोठ्या प्रमाणावर पदयात्रा घडलेल्या आहेत. गल्ल्याबोळ ते महामार्ग, चाळ ते फ्लॅट संस्कृती, महापालिका शाळा ते प्रतिष्ठित वैद्यकीय महाविद्यालये असा हा प्रवास आहे. चाळीतील गजबजलेले, गरिबीने गांजलेले बालपणाचे दिवस, वेळी-अवेळी रस्तोरस्ती भटकणे यामुळे पांढरपेशावर्गाने सहजी न पाहिलेले जनजीवन, त्यातील विदारक, धक्कादायक वैयक्तिक-सामाजिक अनुभव. (त्यात स्वातंत्र्यपूर्व आंदोलनाचा काळ आहे.) चित्रविचित्र स्वभावाचे मानवी नमुने त्यात आहेत, पण महत्त्वाचे आहे ते वेळोवेळी प्रकटणारे त्यांचे चिंतनशील मन. मुंबापुरीचे आणि माणसांचे हे केवळ अलंकारिक भाषेतील वर्णन नाही. एका सजग, संवेदनक्षम मनाने घेतलेली नोंद आहे. त्या मनावर त्या भवतालाचे होणारे सुखद दु:खद परिणाम आहेत.

कोकणातल्या गावी वडिलांबरोबर फिरायला जाण्याचा ‘दुर्मिळ’ योग आला म्हणून उड्या मारत निघालेल्या लेखकाला वडील समुद्रकिनारी घेऊन जातात. मात्र पुढे जी वाट धरतात ती जाते स्मशानाकडे. ‘हे बघ स्मशान’ म्हणून त्याला दाखवून ते स्वत: भेटलेल्या परिचिताशी गप्पा मारण्यात दंग होतात. मिट्ट अंधार पडेपर्यंत शाळकरी वयाचे मूल स्मशानासमोर मुकाट बसून!

जी.एस. वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर त्या इमारतीविषयी परकेपणाचा अनुभव का यावा याचे मूळ शोधू जाता-जाता, लेखक पार पोर्तुगीज-ब्रिटिश अंमलातील मुंबईच्या इतिहासात शिरतो. त्यावेळच्या निसर्गसुंदर परळचे कल्पनेने चित्र उभे करतानाच तत्कालीन रोगराई पीडित, दुषित पाणी पुरवठ्याने ग्रस्त मुंबईचेही दर्शन घडवतो आणि पुन्हा मूळ विषयाकडे परतून, आई गंभीर आजारी असताना घडलेल्या के.इ.एम. दर्शनाकडे येऊन आपल्या परकेपणाच्या भावनेचे विश्लेषण करतो.

सरस्वती हायस्कूलच्या गच्चीवरील ताडपत्रीला फटाक्यांनी लागलेली आग आणि त्यावेळचे सामान्य माणसाचे स्वार्थी वर्तन, फायर ब्रिगेडच्या जवानांचे शिस्तशीर प्रयत्न आणि रोज सुरे भोसकून माणसे मारणाऱ्या गुंडाचा पाण्याच्या बादल्या ओतून आग विझवण्याचा उद्योग - हा सर्व प्रसंग असो, ४६ सालच्या नौदल बंडाच्या वेळी उसळलेली दंगल असो, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन असो की वैयक्तिक आयुष्यात आईचे आजारपण, वडिलांचे दारूचे व्यसन आणि दारिद्र्य यातून ओढावलेले कोवळ्या वयातले आघाताचे प्रसंग किंवा पुढे शरीरशास्त्र शिकताना केलेले शवविच्छेदन असो; अशा सर्व प्रसंगी जे विचारांचे काहूर मनात उठले तेही त्या प्रसंगवर्णनासोबत येते आणि सर्व अनुभवांना चिंतन-विश्लेषणाची जोड देते.

या चिंतनाच्या जोडीला संगीत ऐकण्या-शिकण्यासाठी केलेली धडपड, काही गुरूजनांचे सुखद, प्रेरणादायी सहवास, त्यातून घडत गेलेली वाङ्मयाभिरुची, विस्तृत वाचन हे सर्व तपशील, वाचनातून आलेली इंग्लिश-संस्कृत अवतरणे, विनोदाची पखरण यामुळे हे पुस्तक अत्यंत वाचनीय झाले आहे.

आठवणी बालपणाच्या असल्या, तरी त्याकडे पाहणारी नजर प्रौढ, प्रगल्भ आहे. त्यावेळच्या अबोध-धूसर मनोवस्थांचे अर्थनिर्णयन आजघडीचे आहे.

एकूण चित्र व्यक्तिगत-सामाजिक जीवनाचा विस्तृत आणि समृद्ध आलेख समोर ठेवते. मुंबापुरीचेही विविधांगी, तपशीलवार दर्शन घडवते, गहन-गूढ मानवी मनोव्यापारांचे चित्र रेखाटून विचारप्रवृत्त करते आणि खुद्द लेखकाच्या बाबतीत विपरीत परिस्थितीतूनही केवळ स्वत:च्या व्यासंगातून, अभ्यासातून, कलावाङ्मयाच्या संस्कारातून एका उनाड मुलाचे एक विकसित व्यक्तिमत्त्वात रूपांतर होताना दिसते. कुशाग्र बुद्धिमत्ता, रसिकता, विनोदबुद्धी, संवेदनशीलता यांनी युक्त असे एक समृद्ध व्यक्तिमत्त्व. इतिहासातील एक महत्त्वाचा कालखंड डोळ्यांसमोर उभा राहतो. याचे श्रेय लेखकाला तर आहेच, पण हे पुस्तक प्रकाशित करणाऱ्या सोलापूरच्या ‘सुविद्या प्रकाशना’लाही द्यायलाच हवे.

**मंदाकिनी देशपांडे**
दादर, मुंबई
दूरध्वनी - २४२२०६७९

# ग्रंथाली @गांगल.लिंक

## विनायक गोखले

कोकण मराठी साहित्य परिषदेचे तेरावे मराठी साहित्य संमेलन रोहा येथे पंधरा ते सतरा एप्रिल रोजी झाले. दिनकर गांगल यांना या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान मिळाला. यानिमित्ताने ग्रंथालीने एका अभिनव उपक्रमाची तयारी केली. दिनकर गांगल यांचा जन्म रोह्याचा आणि ग्रंथाली वाचक चळवळीचा आरंभ, त्यांच्या नेहरूनगर कुर्ला येथील घरातून झाला. ग्रंथालीने या संमेलनानिमित्त 'कर्मभूमी ते जन्मभूमी' या यात्रेचे आयोजन रत्नागिरी व रायगड जिल्ह्यातील निवडक ठिकाणी स्थानिक कोकण मराठी परिषदेच्या कार्यकर्त्यांच्या साहाय्याने व सार्वजनिक ग्रंथालयांच्या साहाय्याने केले.

ग्रंथालीसह अन्य मान्यवर प्रकाशकांच्या पुस्तकांचे प्रदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम असे त्याचे स्वरूप होते. यात मुख्य भाग म्हणजे प्रत्येक केंद्रावर दिनकर गांगल यांनी स्थानिकांशी संवाद साधला.

रविवार, दि. ३ एप्रिल रोजी सायंकाळी नेहरूनगर कुर्ला येथे या उपक्रमाची सुरुवात झाली. दिनकर गांगल यांच्यासह ग्रंथालीचे कार्यकर्ते, लेखक, को.म.सा.प.चे पदाधिकारी महेश केळुस्कर, अशोक बागवे, दिलीप पाटील, नारायण लाळे, रेखा नार्वेकर आदी उपस्थित होते. महेश केळुस्कर व रेखा नार्वेकर यांच्या हस्ते दिनकर गांगल व अनुराधा गांगल यांचा सत्कार झाला. नंदकुमार पाटील यांनी हॅपनिंगमध्ये शब्दकोडी, कीर्तन, कथाकथन असे कार्यक्रम विविध कलाकारांच्या साहाय्याने सादर केले. कार्यक्रमाची सांगता या यात्रेसाठी खास तयार केलेल्या ग्रंथरथास हिरवा झेंडा दाखवून झाली.

वैयक्तिक सांस्कृतिक कार्यक्रमांचा तपशील पुढीलप्रमाणे–

४ एप्रिल – के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय पनवेल – माधवी घारपुरे यांचे कथाकथन व प्रश्नोत्तरे

५ एप्रिल – महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालय, पेण – गालावर खळी एक रोमँटिक संवाद, सहभाग – समीरा गुजर व चंद्रशेखर सानेकर

६ एप्रिल – सार्वजनिक वाचनालय, श्रीवर्धन, 'हास्यचित्र असे जन्म जन्मास येते' प्रात्यक्षिकांसह, सहभाग – विवेक मेहेत्रे व स्नेहा आधारकर

७ एप्रिल – 'पंखाविना भरारी' हा लघुपट, लेखिका शरयू घाडी यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम दापोली येथे झाला. मालगुंडला ९ एप्रिल, चिपळूण १० एप्रिल रोजी शरयू घाडी यांची मुलाखत लतिका भानुशाली यांनी घेतली. तसाच मुलाखतीचा कार्यक्रम महाड येथेही १२ एप्रिल रोजी झाला.

रत्नागिरी येथे १० एप्रिल रोजी महेश




**यात्रेचा आरंभ ग्रंथरथास झेंडा दाखवून झाला. झेंडा दाखवताना महेश केळुसकर, त्यांच्या शेजारी अशोक बागवे व डावीकडून स.पां. देशपांडे, सुदेश हिंगलासपूरकर, अ.पां. देशपांडे, अनुराधा गांगल आणि दिनकर गांगल**

केळुस्कर यांच्या 'कवडसे' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन नगर वाचनालयात झाले. त्यावेळी झालेल्या कविसंमेलनात नीरजा, अशोक बागवे, अशोक कोतवाल व महेश केळुस्कर यांनी आपल्या कविता सादर केल्या.

यात्रेच्या शेवटच्या मुक्कामात माणगाव येथे १३ एप्रिल रोजी गझलकार चंद्रशेखर सानेकर व संगीतकार मिथिलेश पाटणकर यांनी एका उन्हाची कैफियत हा संगीतमय कार्यक्रम केला तर दुसऱ्या दिवशी ग्लोबल कोकण, सांस्कृतिक, सामाजिक व औद्योगिक क्षेत्रात कोकणचे योगदान या परिसंवादात, मधु मंगेश कर्णिक, दिनकर गांगल, अभिजित हेगशेट्ये, दिलीप चावरे व सतीश कामत सहभागी झाले.

मंगळवार दि. १२ एप्रिल रोजी को.म.सा.प.महाड शाखेने दिनकर गांगल यांचा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्याबद्दल जाहीर नागरी सत्कार केला.

बुधवार दि. १३ एप्रिल रोजी हुतात्मा स्मारक सभागृह, महाड येथे जयंत ओक यांचा 'गप्पागोष्टी' हा एकपात्री कार्यक्रम झाला.

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांचा सहभाग फक्त संमेलनापुरता असतो पण या उपक्रमात दिनकर गांगलांनी पनवेल, पेण, श्रीवर्धन, दापोली, रत्नागिरी येथे स्थानिक कार्यकर्ते, लेखक व श्रोत्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. वाचनाचे वेड, नव्या माध्यमांच्या शोधात, मानव मोक्षाप्रत, शेवटचे वर्तमानपत्र या विषयावर त्यांची भाषणे झाली. रत्नागिरीला अरुण साधू व गांगल यांच्या साहित्यिक-सांस्कृतिक गप्पांचा योग जुळून आला.


प्रत्येक गावात दोनच दिवस कार्यक्रम झाल्यामुळे कार्यकर्त्यांची धावपळ होत होती. पण या यात्रेमुळे सर्व ठिकाणी नवीन कार्यकर्ते ग्रंथालीला मिळाले. त्यांनी उत्साहाने सहकार्य केले. पनवेल वाचनालयाचे संजय गोडसे व त्यांचे अन्य सहकारी, दापोलीचे प्रा. माने व संदेश सोमण यांचे बहुमोल सहकार्य मिळाले. सुखदेव काळे, प्रमोद गंधे, श्रीनिवास गडकरी, विनायक गोखले (पेण), अभिजित हेगशेट्ये यांचा सहभाग सहवास आनंददायी होता.

या दोन जिल्ह्यांत अनेक ठिकाणी पुस्तकांची दुकाने नाहीत. चांगली पुस्तके लगेच मिळण्यासाठी पुणे, मुंबई येथे जावे लागते. दापोलीचे प्रा. माने यांना दापोलीत पुस्तकविक्री केंद्र सुरू करावयाचे आहे. असे ग्रंथप्रेमी व कार्यकर्ते अजून कार्यक्रमांत रस घेताना दिसतात. तरी बदलत्या सामाजिक संदर्भांचे दर्शनही घडले. सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थिती ज्येष्ठ नागरिकांची असते. सांस्कृतिक कार्यक्रम ठरवताना स्थानिक संयोजक आमच्याकडे दूरदर्शनवरील मालिकेत काम करणारा एखादा कलाकार आणा असे आवर्जून सांगत.

वाचनवेडाला असे नवीन आकर्षक पर्याय उपलब्ध होऊ लागले आहेत. व्यंगचित्रकला, कथाकथन असे कलाप्रकार पुढील काळात कोण सादर करेल असा प्रश्न पडताना, एकूणच जाणून घेण्याची प्रवृत्ती मर्यादित दिसते.

शालेय, महाविद्यालयीन तरुणांसमोर असे उपक्रम केले तर भावी काळात लेखक, कलावंत तयार होतील.


**ग्रंथाली मुद्रण सुविधा केंद्र प्रकाशित....**




*मी विंदा बोलत्येय!*

**जयमाला देसाई**

"खरे म्हणजे स्वर्गातून शाप घेऊन पृथ्वीवर आलेली विंदा नावाची ही परी शापित असूनही भाग्यवानच म्हटली पाहिजे कारण, तिला स्वत:ला आपल्या पायावर उभे करणारे, फुलासारखे जपणारे, लाडाकोडात ठेवणारे प्रेमळ व सुज्ञ आईवडील लाभलेले आहेत. कल्पकसारखा प्रेमळ पाठचा भाऊ लाभलेला आहे. हे असे भाग्य प्रत्येक शापित परीला लाभतेच असे नाही."

**प्रसाद कुलकर्णी**
नामवंत कवी

**मूल्य १२० रु.**
**सवलतीत ७० रु.**